## मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,मुंबई
## शुक्रवार दिनांक ०२/०५/२००३ रोजी झालेल्या ८९ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची ८९ वी बैठक शुक्रवार दि.०२/०५/२००३ रोजी दुपारी ४.०० वाजता गृहनिर्माण भवनातील तिस-या मजल्यावरील गुलझारीलाल नंदा सभागृह येथे संपन्न झाली. सदर बैठकीस खालील मान्यवर उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा.आमदार श्री.सचिन भाऊ अहिर | सभापती |
| २. | श्री.सुरेश कारंडे | मुख्य अधिकारी |
| ३. | श्री.सी.के.जाधव | उप सचिव,म.शा. |
| ४. | मा.श्री.सचिन मा.सावंत | सदस्य |
| ५. | मा.श्री.विश्वास मोकाशी, | सदस्य |
| ६. | मा.श्री.गजेंद्र लष्करी | सदस्य |
| ७. | मा. श्री. रघुनाथ थवई | सदस्य |
| ८. | मा. श्रीमती छाया कल्याणी | सदस्या |
| ९. | मा. श्री. रमेश परब | सदस्य |
| १०. | मा. श्री उस्मान गणी कुरेशी (लालीभाई) | सदस्य |
| ११. | मा.श्री.मोहन देसाई | सदस्य |
| १२. | मा. श्री. बाप्पा सावंत | सदस्य |
| १३. | मा. श्री. अबुबकर मुसा बाटलीवाला | सदस्य |
| १४. | प्रमुख अभियंता, म.न.पा. यांचे प्रतिनीधी | निमंत्रक |
| १५. | उपकर निर्धारक व संकलक हयांचे प्रतिनिधी | निमंत्रक |

बैठकीच्या सुरवातीस मा. सभापती हयांनी उपस्थित सर्व सन्मा. सदस्य व अधिकारी/कर्मचारी वर्गाचे स्वागत करुन बैठकीच्या कामकाजास सुरुवात करण्याच्या सूचना सचिवांना दिल्या. त्यानुसार सचिव हयांनी मा. सभापती, सन्मा. सदस्य व अधिकारी/कर्मचारी वर्गाचे स्वागत करुन बैठकीस सुरुवात केली.

---

**बाब क्रमांक : ८९/१**

विषय- दि. ०७.०४.२००३ रोजी संपन्न झालेल्या मंडळाच्या
८८ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत स्थायी करण्याबाबत.

---

सदर कार्यवृत्तांत स्थायी करण्यासाठी पृ.क्र.१ ते ५३ वर सादर करण्यात आला आहे.

मा. सदस्य श्री. गजेंद्र लष्करी हयांनी असे प्रतिपादन केले की, मागील बैठकीत उपमुख्य अभियंता (उत्तर) श्री. जोगळेकर हयांनी चांगले प्रस्ताव सादर केल्याबाबत त्यांची प्रशंसा करण्यात आली होती. मात्र

त्याबाबतचा उल्लेख सदर कार्यवृत्तांत करण्यात आलेला नाही. त्यामुळे सदर बाबीची नोंद करण्याची सूचना मा. सदस्य श्री. गजेंद्र लष्करी हयांनी केली.

मा. सभापती हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, मा. सदस्य श्री. गजेंद्र लष्करी हयांनी उपमुख्य अभियंता (उत्तर) श्री. जोगळेकर हयांची प्रशंसा केल्याची नोंद कार्यवृत्तांतात करणे आवश्यक आहे. मंडळाच्या कोणत्याही अधिकारी/कर्मचारीवर्गाची प्रशंसा केल्यास त्याची नोंद कार्यवृत्तांत घेणे आवश्यक आहेच. त्यामुळे मा. सभापती हयांनी सचिव हयांना अशा सूचना दिल्या की, उपमुख्य अभियंता (उत्तर) श्री. जोगळेकर हयांची मागील बैठकीत चांगले मुद्दे उपस्थित केल्याबाबत मा. सदस्य श्री. गजेंद्र लष्करी हयांनी त्यांची प्रशंसा केल्याचा उल्लेख कार्यवृत्तांत करण्यात यावा.

तदनुसार सचिव हयांनी हयाबाबत दिलगीरी व्यक्त करुन केली. तदनंतर मा. सदस्य श्री. गजेंद्र लष्करी हयांनी मंडळाच्या मागील बैठकीत उपमुख्य अभियंता (उत्तर) श्री. जोगळेकर हयांची चांगले मुद्दे उपस्थित केल्याबाबत त्यांची प्रशंसा करण्यात आली हयाची नोंद घेतली.

मा. सदस्य श्री. रघुनाथ थवई हयांनी तदनंतर पृ.क्र.२९ वरील ठराव क्र. ८८/६८७ मधील मुद्दा क्र. २ व ३ च्या अनुषंगाने असे प्रतिपादन केले की, रहिवाशी जर मालकाकडे उपकर जमा करीत असतील मात्र घरमालक जर म.न.पा. कडे उपकराचा भरणा करीत नसेल अशा प्रकरणात जर रहिवाशांनी ना.ह.प्र.पत्राची मागणी केली तर त्यांना ना.ह.प्र.पत्र देण्यास हरकत नसावी.

उपमुख्य अभियंता (उत्तर) हयांनी तद्नुषंगाने असे प्रतिपादन केले की, अशा प्रकरणात आपण अद्यावत उपकर भरल्याबाबतचे वचनपत्र घेऊन ना.ह.प्र.पत्र प्रदान करीत असतो.

वरील सविस्तर चर्चेअंती मंडळाच्या दि. ०७.०४.२००३ रोजी संपन्न झालेल्या ८९ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत सर्वानुमते स्थायी करण्यात आला.

------------ooo----------

**बाब क्रमांक : ८९/२**

विषय- नियंत्रण कक्षात प्राप्त झालेल्या संदेशाची माहिती.
(दि. ०१.०४.२००३ ते २८.०४.२००३)

------------

सदर माहिती पृ.क्र.५५ वर अवलोकनार्थ सादर करण्यात आली आहे.

सदर माहितीची नोंद सर्व सन्मा. सदस्यांनी घेतली.

---------------ooo-----------

**पुनर्रचना विभाग**

**बाब क्रमाक : ८९.३ (अ)**

विषय- इमारत बावला कंपाऊंड एफ/एस विभाग,सी.एस.क्र.२,मुंबई
हया इमारतीच्या पुनर्बांधणी योजनेस सुधारित प्रशासकीय
मान्यता मिळणेबाबत.

----------------------

सदर प्रस्ताव पृ.क्र.५७ ते ६७ वर सादर करण्यात आला आहे.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने उपमुख्य अभियंता (पुनर) हयांनी असे प्रतिपादन केले की, विषयांकित इमारतीची पुनर्बांधणी योजना मंडळाने कार्यान्वित केली असून जून्या इमारतीतील २७७ गाळयांऐवजी नवीन इमारतीत ५९६ गाळे बांधले जाणार आहेत. त्यामुळे मंडळाला एकूण ३१९ गाळे अतिरिक्त उपलब्ध होणार आहेत. हया योजनेस एकूण रु. १६,६५,७०,२३६/- इतका खर्च अपेक्षित असून त्यास मंडळाची सुधारित प्रशासकीय मंजूरी आवश्यक आहे. त्यानुसार सदर प्रस्ताव प्रशासकीय मंजूरीसाठी सादर करण्यात आला आहे.

सविस्तर चर्चेअंती सदर योजनेस प्रशासकीय मंजूरी देण्याचे सर्वानुमते ठरले.

---------------oo--------------

**ठराव क्रमांक : ८९/६९०**

**सी.एस.क्र.२, बावला कंपाऊंड, एफ.एस.विभाग, मुंबई येथील इमारतींच्या पुनर्बांधणी योजनेच्या रु.१६,६५,७०,२३६/- खर्चास सुधारित प्रशासकीय मंजूरी सर्वानुमते प्रदान करण्यात आली.**

..............oo............

**बाब क्रमाक : ८९.३ (ब)**

विषय- १३-१५, तुकाराम जावजी मार्ग, मेरवान इमारत, भूकर क्र.२८८,
ताडदेवच्या पुनर्बांधणीबाबत.

--------------------------

सदर प्रस्ताव पृ.क्र.६९ ते ७५ वर सादर करण्यात आला आहे.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने उपमुख्य अभियंता (पुनर) हयांनी असे प्रतिपादन केले की, पूर्वीच्या पंतप्रधान अनुदान प्रकल्पांतर्गत इ.क्र.१३-१५-१७-२१ए व २३-२७, तुकाराम जावजी मार्ग हया इमारतींची संयुक्त पुनर्बांधणी हाती घेतली होती व त्यासाठी रु. ७९.९२ लक्ष खर्चास प्रशासकीय मंजूरी देण्यात आली होती. तदनंतर इ.क्र. १३-१५ वगळता इतर इमारतींची पुनर्रचना पंतप्रधान अनुदान प्रकल्प बंद झाल्यानंतर इ.क्र.१३-१५, तुकाराम जावजी मार्ग ही पुनर्बांधणीसाठी दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाकडे आली आहे. त्यानुसार इ.क्र.१३-१५, तुकाराम जावजी मार्ग हया इमारतीची पुनर्रचना योजना मंडळाने कार्यान्वित केली असून जून्या इमारतीतील ४८ गाळयांऐवजी नवीन इमारतीत एकूण ७४ गाळे बांधण्यात येणार आहेत. एकूण २६ गाळे मंडळाला अतिरिक्त उपलब्ध होणार आहेत. न्यायालयीन आदेशांनुसार तसेच कालापव्यय टाळण्याच्या दृष्टीने सुधारित प्रशासकीय मंजूरी न घेता पुनर्बांधणीच्या कामास सुरुवात करण्यात आलेली आहे. त्यामुळे आतापर्यंत मंडळाने हया इमारतीच्या पुनर्बांधणीबाबत जी कार्यवाही केली आहे त्यास मंडळाची कार्योत्तर मंजूरी आवश्यक आहे तसेच हया योजनेच्या रु.१,८८,०९,५००/- खर्चास मंडळाची सुधारित प्रशासकीय मंजूरी आवश्यक आहे.

सविस्तर चर्चेअंती हया इमारतीच्या पुनर्बांधणीबाबत आतापर्यंत केलेल्या कार्यवाहीस कार्योत्तर मंजूरी देण्याचे तसेच सुधारित प्रशासकीय मंजूरी देण्याचे सर्वानुमते ठरले.

--------------oo------------

**ठराव क्रमांक : ८९/६९१**

**१३-१५, तुकाराम जावजी मार्ग, मेरवान इमारत, भूकर क्र.२८८, ताडदेव हया इमारतीच्या पुनर्बांधणीसाठी रक्कम रु. १,८८,०९५००/- खर्चास सर्वानुमते प्रशासकीय मंजूरी देण्यात आली तसेच ही इमारत राजीव गांधी निवारा प्रकल्पांतर्गत मुळ योजनेच्या प्रशासकीय मंजूरीतून वगळण्यास व स्वतंत्र प्रशासकीय मंजूरी अगोदर हया इमारतींच्या पुनर्बांधणीबाबत केलेल्या कार्यवाहीस कार्योत्तर मंजूरी सर्वानुमते प्रदान करण्यात आली.**

..................oo................

**बाब क्रमाक : ८९.३ (क)**

विषय- इ.क्र.६०२-१०, ६०६ए, ६०६-बी, ना.म.जोशी मार्ग, ई.विभाग, हया पुनर्बांधणी योजनेच्या कामाची न्यूनतम निविदेस मंजूरी देण्याबाबतचा प्रस्ताव.

----------------------

सदर प्रस्ताव पृ.क्र.७७ ते ८७ वर सादर करण्यात आला आहे.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने उपमुख्य अभियंता (पुनर्र) हयांनी असे प्रतिपादन केले की, हया इमारतीची पुनर्बांधणी योजना मंडळाने हाती घेतली असून सदर योजनेस मंडळाच्या दि. २०.३.१९९८ रोजीच्या बैठकीत रक्कम रु. १५८.५६ लक्ष खर्चास प्रशासकीय मंजरी प्रदान करण्यात आली आहे. हया पुनर्बांधणी कामाची निविदा रक्कम रु.२१५३९६७६/- असून एकुण १० निविदा प्राप्त झाल्या असून त्यापैकी तीन ठेकेदारांनी आवश्यक बार्बीची पूर्तता सादर न केल्याने त्यांच्या निविदा उघडण्यात आल्या नाहीत. उर्वरित ७ निविदांपैकी मे. मोतीराम बुधरमल हयांची १८.१८ टक्के उणे दराची निविदा निम्नतम आहे. हया ठेकेदाराने आतापर्यंत केलेली कामे समाधानकारक आहेत. त्यामुळे त्यांची निविदा स्विकृत करण्याबाबतचा प्रस्ताव मंडळापुढे विचारार्थ सादर करण्यात आला आहे.

सविस्तर चर्चेअंती मे. मोतीराम बुधरमल हयांची उणे १८.१८ टक्के दराची निम्नतम निविदा स्विकृत करण्याचे सर्वानुमते ठरले.

-------------oo----------------

**ठराव क्रमांक : ८९/६९२**

**इ.क्र.६०२-१०, ६०६ए, ६०६-बी, ना.म.जोशी मार्ग, ई.विभाग, हया इमारतीच्या पुनर्बांधणी कामासाठी मे. मोतीराम बुधरमल हयांची उणे १८.१८ टक्के दराची निम्नतम निविदा स्विकृत करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.**

................oo...........

**बाब क्रमाक : ८९.४ (अ)**



विषय- म्हाड अधिनियम १९७६ च्या कलम ८८ (३) (अ) नुसार प्रमाणपत्र जारी करण्याचे प्रस्ताव.

१) इ.क्र.१४-अ, मुझावर पाखाडी रोड, माझगाव,ई.विभाग,
२) इ.क्र.१०, कामाठीपुरा १५वी गल्ली, ई.विभाग,
३) इ.क्र.२३-२६ए, चापशी भिमजी रोड, ३८ए, ४०-४४, ४८-५०, ५०ए ते ५० एफ,म्हातार पाखाडी रोड माझगाव.
४) इ.क्र.११-१३, बतुल हाऊस,डी.एन.सिंग रोड,हाथी बाग, माझगाव,ई.विभाग,

-----------------------

सदर प्रस्ताव पृ.क्र.८९ ते १४७ वर सादर करण्यात आले आहेत.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने उपमुख्य अभियंता (उत्तर) हयांनी असे प्रतिपादन केले की, हया इमारतींच्या दुरुस्ती खर्चाचा दर हा प्रचलित प्रमाणित मर्यादा रु.१०००/- प्रति चौ.मी.पेक्षा अधिक असून रु.१०००/- प्रति चौ.मी. वरील जादा रक्कम रहिवाशांनी मंडळाकडे जमा केलेली नाही. अनु क्र.३ वर सादर केलेल्या इ.क्र.२३-३६ए, चापशी भिमजी रोड, ३८ए,४०-४४, ४८-५०, ५०ए ते ५० एफ, म्हातारपाखाडी रोड, माझगाव हया इमारतींना पूर्वीच्या कलम ३३ (३) नुसार प्रमाणपत्र दिले असावे. परंतु त्याबाबतच्या नोंदी उपलब्ध कागदपत्रांमध्ये नाहीत. त्यामुळे हया इमारतींना कलम ३३ (३) ची दुय्यम प्रत जारी करण्याचा प्रस्ताव आहे.

सविस्तर चर्चेअंती विषयांकित इमारतींना कलम ३३ (३) (अ) व ३३ (३) नुसार प्रमाणपत्र जारी करण्याचे सर्वानुमते ठरले.

**ठराव क्रमांक : ८९/६९३**

**अ) खालील इमारती म्हाड कायदा १९७६ मधील कलम ८८ (३) (अ) अन्वये दुरुस्तीच्या विहित प्रमाणित मर्यादेच्या पलिकडे घोषित करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली. व इतिवृत्ताचे स्थायीकरणाची वाट न बघता पुढील कार्यवाही करण्यासाठी प्रशासनास अनुमती देण्याचे सर्वानुमते ठरले.**

**१) इ.क्र.१४-अ, मुझावर पाखाडी रोड, माझगाव,ई.विभाग,**
**२) इ.क्र.१०, कामाठीपुरा १५वी गल्ली, ई.विभाग,**
**३) इ.क्र.११-१३, बतुल हाऊस,डी.एन.सिंग रोड,हाथी बाग, माझगाव,ई.विभाग,**

**ब) इ.क्र.२३-२६ए, चापशी भिमजी रोड, ३८ए, ४०-४४, ४८-५०, ५०ए ते ५० एफ,म्हातार पाखाडी रोड माझगावबाबत खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला.**

**विषयांकित इमारतींसाठी तत्कालिन मंडळाने १९७५-७७ च्या दरम्यान तत्कालिन दुरुस्ती मंडळाच्या कायद्यातील कलम ३३ (३) चा निर्णय घेतला होता. त्याप्रमाणे तसे प्रमाणपत्र देखील जारी करण्यात आले आहे असे गृहीत धरण्यात येत आहे. मात्र तेव्हाचे कलम ३३ (३) चे प्रमाणपत्र व त्या प्रमाणापत्राच्या प्रस्तावासह असलेली भाडेकरुंची यादी सापडत नसल्याने व हया इमारतींच्या पुनर्रचनेचा प्रस्ताव तयार करावयाचा असल्याने मंडळाच्या कार्यालयात उपलब्ध असलेल्या कागदपत्रांवरुन/ भाडेकरु व भोगवटादारांची यादी ग्राहय धरुन कलम ३३ (३) चे प्रमाणपत्र दुय्यम प्रत या संज्ञेखाली देण्यास सर्वानुमते सर्वानुमते मंजूरी देण्यात आली. मात्र तत्पूर्वी भोगवटादार/भाडेकरुंच्या बाबतच्या नावाची तपासणी**

**ग्राहयता उपमुख्य अधिकारी (सं.गा)/(पु.गा.) यांनी त्यांच्याकडे उपलब्ध असलेली कागदपत्रे तपासून घ्यावी व सहमुख्य अधिकारी हयांनी याबाबत निश्चित खात्री करुन त्यानंतरच कलम ३३ (३) (अ) चे दुय्यम प्रमाणपत्र मंडळाचे विभागीय कार्यकारी अभियंता यांनी जारी करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.**

-----------------ooo--------------

बाब क्रमांक : ८९.४ (क)

विषय- इ.क्र.३९ अ, नरीया हाऊस, डॉकयार्ड रोड.
---- दुरुस्तीचे अंदाजपत्रक
-------------

सदर प्रस्ताव पृ.क्र.१५९ ते १६५ वर सादर करण्यात आला आहे.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने उपमुख्य अभियंता (उत्तर) हयांनी असे प्रतिपादन केले की, ही इमारत दुस-या टप्प्याच्या दुरुस्तीसाठी प्रस्तावित केली असून दुरुस्ती खर्चाचा दर रु.१४४३.४० प्रति चौ.मी. आहे. रु.१०००/- प्रति चौ.मी. वरील जादा रक्कम रु. २.३४ लक्ष असून सदर रक्कमेचा भरणा रहिवाशांनी मंडळाकडे केलेला नाही. मात्र रहिवाशांनी असे कळविले आहे की, अतिरिक्त निधी प्राप्त करुन घेण्यासाठी मा. आमदारांशी संपर्क साधण्यात येत आहे. मा. मंत्री महोदय (गृहनिर्माण) हयांनी दूरध्वनीवरुन हया इमारतीच्या दुरुस्तीसाठी रु. २.०० लक्ष निधी दिला जाईल असे कळवून दुरुस्ती त्वरित चालू करण्याचे आदेश दिले आहेत. मात्र अद्याप त्याबाबतचे पत्र दिलेले नाही. हया इमारतीच्या शौचालयाचा भाग त्वरित दुरुस्त करणे आवश्यक असून रहिवाशांनी सदर शौचालयाचा भाग त्वरित दुरुस्त करण्याबाबत विनंती केली आहे. अशा परिस्थितीत हया इमारतीच्या दुरुस्तीच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मंजूरी प्रदान करावी किंवा ही इमारत म्हाड अधिनियम १९७६ च्या कलम ८८ (३) (अ) च्या प्रमाणपत्रान्वये घोषित करावी किंवा कसे हयाबाबतचा हा प्रस्ताव स्वतंत्रपणे मंडळापुढे सादर करण्यात आला आहे.

मा. सदस्य श्री. विश्वास मोकाशी हयांनी तद्नुषंगाने असे सुचविले की, हया इमारतीचा जो भाग तांतडीने दुरुस्त करणे आवश्यक आहे तो भाग खास प्रकरण म्हणून त्वरित दुरुस्त करुन घ्यावा व उर्वरित दुरुस्ती मा. मंत्री महोदयांनी त्यांच्या आमदार निधीमधून निधी उपलब्ध करुन दिल्यानंतर करावी.

मा. सभापती हयांनी असे प्रतिपादन केले की, मा. सदस्य श्री. विश्वास मोकाशी हयांनी सुचविल्यानुसार जर आपण दुरुस्ती केली तर तो एक प्रकारचा पायंडा पडेलव इतर प्रकरणातही आपणास त्यानुसारच दुरुस्ती करावी लागेल. त्यामुळे हया प्रकरणी मा. सदस्य श्री. विश्वास मोकाशी हयांनी सुचविल्यानुसार दुरुस्ती करता येणार नाही.

मा. सदस्य श्री. बाप्पा सावंत हयांनी तद्नुषंगाने असे प्रतिपादन केले की, हया इमारतीची दुरुस्ती त्वरित करण्याचे आदेश मा. मंत्री (गृहनिर्माण) यांनी दिले असल्याने इमारतीची दुरुस्ती करावी व त्यासाठी हे प्रकरण मंडळापुढे स्वतंत्रपणे सादर करण्याची आवश्यकता नव्हती.

मा. सदस्य श्री. सचिन सावंत हयांनी तद्नुषंगाने अशी विचारणा केली की, हया इमारतीची दुरुस्ती करण्याबाबत मा. मंत्री (गृहनिर्माण) यांनी लेखी आदेश दिले आहेत काय ? तदनुसार उपमुख्य अभियंता (उ) यांनी असे प्रतिपादन केले की, मा. मंत्री (गृहनिर्माण) यांनी दूरध्वनीवरुन तोंडी आदेश दिलेले आहेत. हया

प्रकरणात दुरुस्ती खर्चाचा दर रु. १०००/- प्रति चौ.मी. अधिक आहे व रु. १८००/- प्रति चौ.मी. वरील जादा रक्कम रहिवाशांनी मंडळाकडे जमा केलेली नाही. मंडळाच्या मागील बैठकीतील निर्णयानुसार ५० टक्के अधिकची रक्कम मंडळाकडे जमा केल्याशिवाय दुरुस्तीच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मंजूरी प्रदान करता येत नाही. त्यामुळे हे प्रकरण स्वतंत्रपणे मंडळापुढे सादर केले आहे.

मा. सदस्य श्री. विश्वास मोकाशी हयांनी तदनुषंगाने असे सुचविले की, रु. १०००/- प्रति चौ.मी. मर्यादेत उपलब्ध असणा-या निधीतून तांतडीची दुरुस्ती करावी.

उपमुख्य अभियंता (उ) हयांनी त्याबाबत असे प्रतिपादन केले की, हया इमारतीच्या शौचालयाचया भागाची तांतडीने दुरुस्ती करणे आवश्यक असून त्यासाठी अंदाजे रु. २.५० ते रु. ३.०० लक्ष खर्च अपेक्षित आहे. मात्र रु. १०००/- प्रति चौ.मी. मर्यादेनुसार हया इमारतीच्या दुरुस्तीसाठी फक्त रु. १.५० ते १.७५ लक्ष निधी उपलब्ध आहे. अतिरिक्त दुरुस्ती कामासाठी रु. १.०० ते १.५० लक्ष लागणार आहेत जे आमदार निधीतून उपलब्ध केले जातील असे मा. मंत्री महोदयांनी सांगितले आहे.

मा. सभापती हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, दुरुस्तीबाबतचे जे काही नियम ठरविले आहेत त्यानुसार कार्यवाही होणे आवश्यक आहे. पावसाळा जवळच आला असल्याने सदर पावसाळयात हया इमारतीची कोणतीही हानी होऊ नये म्हणून मा. मंत्री महोदयांनी त्वरित दुरुस्ती करण्याबाबत सूचना दिल्या असाव्यात. (एकूण दुरुस्ती काम रु. ३.५० लक्ष रक्कमेचे असून मंडळाकडे रु. १.५० ते १.७५ लक्ष निधी उपलब्ध आहे. उर्वरित रु. १.५० ते २.०० लक्ष निधीचे काम ठेकेदारास विश्वासात घेऊन पूर्ण करुन घ्यावे व दरम्यानच्या कालावधीत आमदार निधीतून निधी उपलब्ध झाल्यानंतर ठेकेदारास त्याच्या खर्चाची पूर्तता करावी. त्यामुळे हया प्रकरणात उपमुख्य अभियंता (उ) हयांनी त्यांच्या स्तरावर सकारात्मकदृष्टया मार्ग काढावा.)

मा. सदस्य श्री. गजेंद्र लष्करी हयांनी तदनुषंगाने असे सुचविले की, आमदार निधी अंतर्गत निधी प्राप्त करुन देण्याबाबतचे पत्र मा. आमदारांकडून प्राप्त करुन घेण्याच्या अटीवर सदर अंदाजपत्रकास प्रशासकीय मंजूरी प्रदान करावी.

मा. सभापती हयांनी तदनुषंगाने असे सुचविले की, हया इमारतीच्या दुरुस्तीच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यास हरकत नाही. व तदनुसार मंडळाकडील उपलब्ध निधीतून हया इमारतीची तांतडीची दुरुस्ती सुरु करावी तसेच उर्वरित दुरुस्ती कामासाठी आमदार निधी अंतर्गत निधी उपलब्ध करुन घेण्याच्या दृष्टीने सतत पाठपुरावा करावा त्यामुळे रु. १०००/- प्रति चौ.मी. मर्यादेपर्यंतच्या दुरुस्ती खर्चास प्रशासकीय मंजूरी प्रदान करावी. आमदार निधी प्राप्त झाल्यानंतर त्यासाठी पुन्हा मंडळाची मंजूरी घेण्याची आवश्यकता नसावी.

उपमुख्य अभियंता (पुनर्र) हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, हया इमारतीच्या दुरुस्ती खर्चाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मंजूरी ही संपूर्ण कामासाठीच द्यावी लागेल. रु. १०००/- प्रति चौ.मी.प्रमाणे उपलब्ध असणा-या रक्कमेस प्रशासकीय मंजूरी देणे योग्य होणार नाही कारण तसे केल्यास आवश्यक दुरुस्तीऐवजी कमी दुरुस्ती खर्चास मंजूरी दिल्यासारखे होईल.

कार्यकारी अभियंता/ई.विभाग हयांनी तदनुषंगाने असे सुचविले की, नियमानुसार संपूर्ण दुरुस्ती कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मंजूरी देणे संयुक्तिक होईल. मात्र वस्तुस्थिती अशी आहे की, संपूर्ण दुरुस्ती खर्चासाठी निधी उपलब्ध नाही. त्यामुळे रु. १०००/- प्रति चौ.मी. वरील खर्चाच्या रक्कमेचा निधी आमदार निधी

अंतर्गत रहिवाशांनी निधी प्राप्त करुन घेण्याच्या अटीवर संपूर्ण दुरुस्ती खर्चाच्या रक्कमेस प्रशासकीय मंजूरी प्रदान करावी.

कार्यकारी अभियंता/ई.विभाग हयांनी सुचविल्यानुसार सदर इमारतीच्या दुरुस्तीच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मंजूरी देण्याचे सर्वानुमते ठरले.

-----------------oo--------------

**ठराव क्रमांक : ८९/६९४**

**इ.क्र.३९ अ, नरीया हाऊस, डॉकयार्ड रोड. ई. विभाग मुंबई हया इमारतीच्या एकूण रक्कम रु. ७,६२,२७५/- (रु. १४४३.४० प्रति चौ.मी.दराने) खर्चाच्या तिस-या टप्प्याच्या दुरुस्तीच्या अंदाजपत्रकास रु. १०००/- प्रति चौ.मी. वरील निधी रहिवाशांनी आमदार निधीअंतर्गत प्राप्त करुन घेण्याच्या अटीवर प्रशासकीय मंजूरी सर्वानुमते प्रदान करण्यात आली.**

....................oo.............

बाब क्रमांक : ८९.४ (ड)

विषय- उत्तर परिमंडळातील २००३ ची उपकरप्राप्त इमारतींची पावसाळापूर्व पाहणी.

-----------------------------------------------

सदर बाब पृ.क्र.१६७ ते १७१ वर माहितीसाठी सादर करण्यात आली आहे.

सदर विषयाच्या अनुषंगाने उपमुख्य अभियंता (उ) हयांनी असे प्रतिपादन केले की, दि. २३.०४.२००३ पर्यंत उत्तर परिमंडळातील जवळ जवळ ९२ टक्के जून्या इमारतींची पावसाळापूर्व पाहणी पूर्ण करण्यात आली असून आजच्या घडीला ही पावसाळापूर्व पाहणी पूर्णही झाली असावी. हया पावसाळापूर्व पाहणीत इ. विभागातील एकूण ७ इमारती धोकादायक आढळल्या असून त्यांची यादी व सद्य:स्थिती पृ.क्र.१७१ वर सादर करण्यात आली आहे तसेच सन २००२ च्या पावसाळापूर्व पाहणीत आढळलेल्या धोकादायक इमारतींबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती पृ.क्र. १६९ वर सादर करण्यात आली असून हया इमारतीसुध्दा हया पावसाळापूर्व पाहणीत धोकादायक आढळल्या आहेत. अशाप्रकारे उत्तर परिमंडळात दि. २३.०४.२००३ पर्यंत केलेल्या पाहणीत एकूण १० इमारती धोकादायक म्हणून घोषित करावयाचे प्रस्तावित आहे. हयाशिवाय दि. २३.०४.२००३ नंतरच्या उर्वरित पाहणीत जर काही अतिरिक्त इमारती धोकादायक म्हणून आढळल्या तर त्यांचाही समावेश धोकादायक इमारतींच्या यादीमध्ये करावा लागेल.

मा. सभापती हयांनी तदनुषंगाने अशी विचारणा केली की, आतापर्यंत केलेल्या पावसाळापूर्व पाहणीत एकूण किती इमारती धोकादायक आढळल्या आहेत. तदनुषंगाने उपमुख्य अभियंता (उ) हयांनी असे प्रतिपादन केले की, आतापर्यंत उत्तर परिमंडळात १० इमारती, दक्षिण परिमंडळात १४ अशा एकूण २४ इमारती धोकादायक आढळल्या आहेत. हया इमारतींचा धोकादायक भाग पाडणे, धोकादायक भागास टेकू लावणे, इमारत खाली करुन घेणे, दुरुस्तीची कार्यवाही करणे इ. अनुषंगिक कार्यवाही सुरु करण्यात आली आहे. सदर माहिती मंडळाच्या माहितीसाठी सादर करण्यात आलेली आहे.

मा. सदस्य श्री. विश्वास मोकाशी हयांनी तदनंतर असे प्रतिपादन केले की, दक्षिण परिमंडळातील उपकरप्राप्त इमारतींच्या पावसाळापूर्व पाहणीचा अहवाल सादर केलेला दिसत नाही. तदनुसार उपमुख्य अभियंता (द) हयांनी असे प्रतिपादन केले की, दक्षिण परिमंडळातील उपकरप्राप्त इमारतींची पावसाळापूर्व पाहणी ९५ टक्के पूर्ण झाली असून ती लवकरच पूर्ण करण्यात येत आहे व त्याबाबतचा अहवाल मंडळापुढे पाहणी पूर्ण झाल्यानंतर सादर केला जाईल.

मा. सदस्य श्री. विश्वास मोकाशी हयांनी तदनुंषंगाने असे सुचविले की, इमारतींची पाहणी पावसाळापूर्वीच करुन अनुषंगिक कार्यवाही करावी. मा. सदस्य श्री. गजेंद्र लष्करी हयांनी तदनंतर असे सुचविले की, जया इमारती आपण धोकादायक म्हणून घोषित करणार आहोत अशा इमारतींच्या ठिकाणी सूचनावजा फलक लावणे आवयक आहे. हया फलकावर असेही स्पष्टपणे नमूद करावे की, ही इमारत धोकादायक असून रहिवाशी स्वतंःच्या जबाबदारीवर इमारतीत रहात आहेत तसेच मा. सदस्य श्री. गजेंद्र लष्करी हयांनी तदनंतर असेही प्रतिपादन केले की, पावसाळापूर्व सर्वेक्षणात आढळलेल्या धोकादायक इमारतींची यादी मा. सभापती हयांनी प्रथम जाहीर करणे आवश्यक आहे. त्यामुळे मा. सभापती हे प्रथम वार्ताहर परिषदेत धोकादायक इमारतींची यादी मे महिन्याच्या शेवटच्या आठवडयात किंवा जून महिन्याच्या पहिल्या आठवडयात जाहीर करतील.

मा. सदस्य श्री.सचिन सावंत हयांनी तदनुंषंगाने असे प्रतिपादन केले की, पावसाळापूर्व पाहणी अद्याप पूर्ण झाली नसल्याने धोकादायक इमारतींच्या संख्येत वाढ होण्याची शक्यता आहे. त्यामुळे पावसाळापूर्व पाहणी पूर्ण झाल्याशिवाय धोकादायक इमारतींची यादी जाहीर करता येणार नाही.

मा. सभापाती हयांनी तदनुंषंगाने असे प्रतिपादन केले की, वास्तविकतः पावसाळापूर्व पाहणी आतापर्यंत व्हावयास हवी हेती. पावसाळापूर्व पाहणीसाठी अतिरिक्त कर्मचारीवर्ग उपलब्ध करुनसुध्दा जर पावसाळापूर्व पाहणी पूर्ण झाली नसेल तर ती गंभीर बाब आहे. यामुळे उपमुख्य अभियंता (द.) हयांनी हयाबाबत लक्ष घालून पावसाळापूर्व पाहणी लवकरात लवकर पूर्ण करावी, असे आदेश मा. सभापती यांनी दिले.

उपमुख्य अभियंता (द.) हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, पावसाळापूर्व पाहणीसाठी जो अतिरिक्त कर्मचारीवर्ग उपलब्ध करुन दिला होता त्यापैकी बरेच कर्मचारी हया कामासाठी उपलब्ध झाले नाहीत व जे अतिरिक्त कर्मचारी उपलब्ध झाले त्यापैकी ब-याचशा कर्मचा-यांनी काही काम केल्यानंतर पावसाळापूर्व पाहणीचे काम ते अर्धवट सोडून गेले. हयामुळे पावसाळापूर्व पाहणी पूर्ण होण्यास विलंब झालेला आहे. मात्र उर्वरित पाहणीचे काम लवकरच पूर्ण करण्यात येत आहे.

मा. सभापाती हयांनी तदनंतर असे प्रतिपादन केले की, आपण ज्या इमारती धोकादायक म्हणून जाहीर करणार आहोत त्या इमारतीं व्यतिरिक्त इतर इमारतींना अपघात होतात असा मागील अनुभव आहे. त्यामुळे पावसाळापूर्व पाहणी काळजीपूर्वक करुन येत्या पावसाळयात उपकरप्राप्त इमारतींना अपघात होणार नाहीत हयाची सर्व अधिका-यांनी दक्षता घेतली पाहिजे. मागे जेव्हा एका इमारतीला अपघात झाला तेव्हा मा. मंत्री, गृहनिर्माण हयांनी तीव्र नाराजी व्यक्त केली होती हयाची सर्वांनाच कल्पना आहे. त्यामुळे येत्या पावसाळयात जर काही अपघात घडले तर आपणांस गंभीर परिणामांना तोंड द्यावे लागेल.

उपमुख्य अभियंता (द.) हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, उपकरप्राप्त इमारतींची पावसाळापूर्व पाहणी केल्यानंतर हया इमारती पडणार नाहीत अशी शाश्वती/हमी देता येणार नाही.

मा. सभापाती हयांनी तदनुंषंगाने असे प्रतिपादन केले की, हया उपकरप्राप्त इमारतींवर दरवर्षी आपण साधारणतः रु. १०० कोटी ची उलाढाल करीत असतो. एवढा खर्च करुनही जर आपण हया इमारतींच्या पाहणी

एखाद्या खाजगी संस्थेकडून करु शकत नाही तर मग आपल्या मंडळाचा काहीच उपयोग नाही. असा प्रश्न विरोध पक्षातर्फे उपस्थित केला जाऊ शकतो.

उपमुख्य अभियंता (दक्षिण) हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, पावसाळापूर्व पाहणी करुन इमारतींच्या अपघाताचे प्रमाण कमी केले जाऊ शकते मात्र पाहणी केल्यानंतर इमारत पडू शकत नाही अशी शाश्वती किंवा हमी देता येणार नाही.

मा. सभापाती हयांनी तदनंतर असे प्रतिपादन केले की,मागच्या वेळी जेव्हा इमारत पडली तेव्हा मा. गृहनिर्माण मंत्री महोदयांनी संबंधित अधिका-यांस निलंबित करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यामुळे असा प्रकार भविष्यात होऊ नये म्हणून त्याची गंभीरपणे दखल घेणे आवश्यक आहे.

प्रभारी कार्य.अभि.(फग/उत्तर विभाग) हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, आपण जेव्हा एखाद्या इमारतीची पाहणी करतो तेव्हा तिचे निरिक्षण हे तिच्या बाहय स्थितीवरुन केले जाते.इमारतीची पाहणी करताना एखादी इमारत बाहय स्थितीवरुन सुस्थितीत आढळून येते. मात्र तिच्या आतील संरचनात्मक भागांच्या स्थितीचे अनुमान काढता येत नाही. बाहय स्थितीवरुन सुस्थितीत आढळणा-या इमारतींच्या आतील भागात कमकुवतपण असेल तर अश बाहय स्थितीवरुन सुस्थितीत आढळणारी इमारत केव्हाही पडू शकते. तसेच प्रत्येक विभागामध्ये फक्त ४ उप अभियंता असून प्रत्येक अभियंत्यांकडे सर्वसाधारणतः ५०० ते ६०० इमारती आहेत. एखाद्या इमारतीचे सविस्तर निरिक्षण करावयाचे झाल्यास साधारणतः किमान अर्धा ते एक तास लागतो. हया सर्वेक्षणाच्या कामाव्यतिरिक्त प्रत्येक उप अभियंत्यांस इतरही अत्यावश्यक कामे वेळोवेळी करावी लागतातच. शिवाय न्यायालयीन प्रकरणांत वारंवार न्यायालयातही जावे लागते. हया सर्व परिस्थितीचा विचार केल्यास पावसाळापूर्व पाहणीसाठी जो कालावधी असतो तो अतिशय कमी असतो. त्यामुळे कमी कालावधीत जास्तीतजास्त इमारतींची पाहण करणे अतिशय अवघड होऊन बसते. तरीही कार्यालयीन कामाव्यतिरिक्त जास्त वेळेत तसेच सुट्टीच्या दिवशीही हया इमारतींची पाहणी पूर्ण करण्याचा प्रयत्न केला जातो. दोन इमारतींमधील गल्ल्यांमध्ये साचणा-या सांडपाणी व कच-याच्या ढीगामुळे इमारतीच्या पायाची स्थिती पाहता येत नाही. हे सांडपाणी पायामध्ये मुरुन पाया कालांतराने कमकुवत होऊन इमारती पडतात.

मा. सभापाती हयांनी तदनुंषंगाने असे प्रतिपादन केले की, आपण जर इमारती न पडण्याची शाश्वती/हमी देऊ शकत नाही तर अशा इमारतींची पाहणी स्ट्रक्चरल इंजिनियरमार्फत करावी लागेल. पंतप्रधान अनुदान प्रकल्प कार्यालयाने पुनर्रचित केलेल्या इमारतींच्या दुरुस्ती कामांची पाहणी आपण स्ट्रक्चरल इंजिनियर्स नियुक्त करुन केलेली आहे जेणेकरुन त्यामध्ये संरचनात्मक भागांची पाहणी करुन इमारतींचे आयुष्य वाढविण्याचा प्रयत्न केला जात आहे.

प्रभारी का.अ.(फग/उ) विभाग हयांनी तदनुंषंगाने असे सुचविले की, हया सर्व इमारतींची पाहणी करण्यासाठी वास्तुशास्त्रज्ञांची नेमणूक करावी. वास्तुशास्त्रज्ञांनी हया इमारतींचा पाहणी अहवाल सादर केल्यानंतर धोकादायक इमारतींची निवडक यादी तयार करुन अशा निवडक धोकादायक इमारतींची पाहणी मंडळाच्या अभियंत्यांमार्फत करावी जेणेकरुन मंडळाच्या अभियंत्यांवर जो सद्यः कामाचा बोजा पडतो तो कमी होण्यास मदत होईल.

मा. सभापाती हयांनी तदनुंषंगाने असे प्रतिपादन केले की, आतापर्यंत झालेल्या चर्चेवरुन असे दिसून येते की, सद्यःची जी पावसाळापूर्व सर्वेक्षणाची पध्दती आहे त्यामध्ये सुधारणा/बदल करणे आवश्यक आहे जेणेकरुन उपकरप्राप्त इमारतींचे सर्वेक्षण काळजीपूर्वक होईल.

उपमुख्य अभियंता (द.) हयांनी तदनंतर असे प्रतिपादन केले की, बी. व सी. विभागामध्ये ज्या इमारती आहेत त्यामध्ये दोन इमारतीतील गल्ल्या फारच अरुंद असून त्याठिकाणी सांडपाणी व कचरा साचलेला असतो. हयामुळे जोपर्यंत हा कचरा व सांडपाणी म.न.पा.तर्फे काढले जात नाही तोपर्यंत त्या भागाखाली असणा-या इमारतीच्या पायाची स्थिती अजमावणे कठीण असते. ब-याचशा इमारतींचे अपघात हे इमारतीचा पाया त्याठिकाणी साचलेल्या सांडपाण्यामुळे कमकुवत होऊन होतात ही वस्तुस्थिती आहे.

मा. सदस्य श्री. बाप्पा सावंत यांनी तदनुंषंगाने असे प्रतिपादन केले की, कोणती इमारत पडू शकते हयाबाबत जर आपण भाष्य करु शकत नाही तर सर्वच इमारती हया त्यांच्या अ. ब. व क. वर्गवारीनुसार धोकादायक आहेत असे गृहीत धरावे व हया सर्वच इमारतींवर लक्ष केंद्रीत करावे

कार्यकारी अभियंता /ई विभाग हयांनी तदनंतर असे प्रतिपादन केले की, मुंबई शहरामध्ये ज्या अंदाजे १९,००० उपकरप्राप्त इमारती आहेत त्यापैकी ब-याचशा इमारती हया १०० वर्षांपेक्षा अधिक जून्या आहेत. हया इमारतींची दुरुस्ती करणे म्हणजे त्यांचे आयुष्य ५ ते १० वर्षांनी वाढविणे इतकाच त्याचा अर्थ आहे. दुरुस्त केलेल्या इमारतीतील एखाद्या न दुरुस्त केलेल्या भागामध्ये केव्हाही कमकुवतपणा निर्माण होऊन दुरुस्त केलेली इमारतसुध्दा पडण्याची शक्यता नाकारता येणार नाही. तसेच प्रभारी का.अ.(फग/उ) विभाग हयांनी सांगितल्यानुसार प्रत्येक उप अभियंत्याकडे साधारणतः ५०० ते ६०० इमारती आहेत. इमारतींची ही प्रचंड संख्या लक्षात घेता सध्या जो कर्मचारीर्वा आहे तो फारच तुटपुंजा आहे. ज्या इमारती आपण धोकादायक म्हणून घोषित करतो त्या इमारतींवर लक्ष केंद्रीत करुन आपण हया इमारती पडू नयेत म्हणून कार्यवाही करीत असतो व हयामुळे हया धोकादायक इमारती पडत नाहीत मात्र ज्या इमारती सुस्थितीत आढळल्याने आपण धोकादायक म्हणून घोषित करीत नाही अशा इमारतींमधील अदृष्य भागांमध्ये केव्हाही कमकुवतपणा निर्माण होऊ शकतो व त्यामुळे हया इमारती पडतील किंवा नाही याबाबत हमी देता येणार नाही. ज्या ज्यावेळी उप अभियंता एखाद्या इमारतीस भेट देतात तेव्हा ते त्या भागातील इतर इमारतींची पाहणी करतात. मात्र तदनंतर त्या भागाला जेव्हा काही कारणानिमित्त उप अभियंता जातील तेव्हाच पुन्हा ते पाहणी करतात. दुरुस्ती विभागातील प्रत्येक उप अभियंत्याकडे कामाचा बोजा फार आहे मात्र त्याला सहाय्यक म्हणून कनिष्ठ अभियंता किंवा तांत्रिक सहायक नाहीत. हयामुळे एकाच उप अभियंत्याने त्याच्याकडील साधारणतः ५०० ते ६०० इमारतींवर एकसारखे नियंत्रण ठेवणे अशक्य आहे. जेव्हा काही इमारतींची पाहणी मुख्य अधिकारी हयांच्यासमवेत केली तेव्हा ब-याचशा इमारतीमध्ये प्लिंथ खाली घेणे, वाढीव बांधकाम करणे इ. प्रकारची अनधिकृत कामे केल्याचे आढळले.हयाबाबत म.न.पा.ला वारंवार कळविण्यात आलेले आहे. अशाप्रकारच्या अनधिकृत बांधकामामुळेही इमारतीस धोका निर्माण होतो. त्यामुळे इमारतींच्या सर्वेक्षणात जर एखादी इमारत बाहय स्थितीवरुन जरी सुस्थितीत आढळली तरी कालांतराने तिच्यामध्ये कमकुवतपणा निर्माण होऊन ती केव्हाही पडू शकते व हयास मंडळाच्या अधिका-यांना दोषी ठरविणे योग्य वाटत नाही. काही इमारतींवर मोठमोठे वृक्ष वाढलेले आहेत.त्यामुळेही इमारतींस धोका निर्माण होऊ शकतो. ही झाडे काढण्याची जबाबदारी म.न.पा.ची असून त्याबाबत म.न.पा.कार्यवाही करीत नाही. अशाप्रकारच्या अनेक अडचणी असल्याने इमारतींचे सर्वेक्षण केल्यानंतर सुस्थितीतील इमारत पडेल किंवा नाही हयाची हमी देता येणार नाही.

मा. सदस्य श्री.बाप्पा सावंत हयांनी तदनंतर असे प्रतिपादन केले की, इमारतींवर वाढणा-या झाडांबाबत रहिवाशी तसेच म.न.पा.तर्फे कार्यवाही होत नाही तसेच इमारतींमधील अरुंद गल्ल्यांमध्ये साचणारा कचरा

जोपर्यंत सुकत नाही तोपर्यंत तो काढण्याचीही कार्यवाही म.न.पा. तर्फे केली जात नाही. पाणी सुकणे म्हणजे ते इमारतीच्या पायामध्ये मुरणे.

प्रभारी कार्यकारी अभियंता, ई.विभाग हयांनी तदनंतर असे प्रतिपादन केले की, एखादी इमारत धोकादायक घोषित केल्यानंतर त्यामधील रहिवाशांना स्थलांतरित करणे व धोकादायक भाग पाडणे हयासाठी रहिवाशांकडून एकसारखा विरोध होत असतो. केव्हा केव्हा ते न्यायालयामार्फत त्यासाठी स्थगितीही आणतात. त्यामुळे रहिवाशांना बळजबरीने स्थलांतरित करणे व धोकादायक भाग पाडणे हयासाठी अभियंत्यांचा बराच वेळ खर्ची होतो

मा. सदस्य श्री. विश्वास मोकाशी हयांनी तदनुषंगाने असे सुचविले की, इमारतीच्या धोकादायक स्थितीबाबत रहिवाशांना जाणीव करुन देण्याच्या दृष्टीने ज्याप्रमाणे आरोग्या संदर्भात फलक लावले जातात त्याचप्रमाणे धोकादायक इमारतींवर मोठया आकाराचे फलक लावावेत.

कार्यकारी अभियंता, ई.विभाग हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, धोकादायक इमारतींच्या ठिकाणी आपण रहिवाशांना जाणीव करुन देण्याच्या दृष्टीने फलक/सूचना संबंधित इमारतींच्या दर्शनी भागावर चिकटविलेल्या आहेत तसेच त्याबाबतची कल्पना त्यांना व्यक्तीशः देण्यात आली असून त्यांच्या स्वाक्ष-याही घेण्यात आल्या आहेत.

मा. सदस्य श्री. विश्वास मोकाशी हयांनी तदनुषंगाने असे सुचविले की, मा. सदस्य श्री. गजेंद्र लष्करी हयांनी उपस्थित केलेल्या मुद्दयानुसार सद्यः जे फलक/सूचना लावल्या आहेत त्या स्पष्टपणे वाचता येत नसल्याने त्या मोठया अक्षरात व रंगाने तयार करुन लावण्यात याव्यात तसेच ज्या ठिकाणी इमारतींच्या दुरुस्तीची कामे चालू असतात त्याठिकाणी लावलेल्या फलकावर काम सुरु केल्याचा दिनांक नमूद केलेला असतो मात्र काम केव्हा पूर्ण होणार हयाची तारीख नमूद केलेली नसते. त्यामुळे काम पूर्ण करण्याचीही तारीख सदर फलकामध्ये नमूद करण्यात यावी.

सदर माहितीची नोंद मा. सभापती व सन्मा. सदस्यांनी घेतली.

-------------------oo-----------------

बाब क्रमांक : ८९.४ (ई)

विषय- उत्तर परिमंडळातील उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ /सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजूरी प्रदान करणेबाबत.

------------------------------

उत्तर परिमंडळातील एकूण ०८ इमारतींच्या दुरुस्ती कामांचे प्रस्ताव पृ.क्र. १७३ ते २०७ वर सादर करण्यात आले आहेत.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने उपमुख्य अभियंता (उत्तर) यांनी हयाबाबत असे प्रतिपादन केले की, उत्तर परिमंडळातील ई विभागातील ४, फग/द विभागातील २, फग/द विभागातील २ अशा एकूण ०८ इमारतींच्या दुरुस्ती कामांची मूळ व सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याचे प्रस्ताव सादर

करण्यात आले आहेत. हयाशिवाय आयत्या वेळच्या विषयात इ.क्र.११५-११७, क्लेअर बिल्डिंग, भायखळा स्टेशन रोड, ई. विभाग हया इमारतीच्या दुस-या टप्प्याच्या दुरुस्तीचे अंदाजपत्रक प्रशासकीय मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत.

सविस्तर चर्चेअंती उत्तर परिमंडळातील एकूण ०९ इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मूळ/सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याचे सर्वानुमते ठरले.

**ठराव क्रमांक : ८८/६८४**

**उत्तर परिमंडळातील एकूण ०९ इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मूळ / सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना सोबत जोडलेल्या " परिशिष्ट-अ " प्रमाणे प्रशासकीय मंजूरी सर्वानुमते प्रदान करण्यात आली.**

---------------oooo----------------

**दक्षिण परिमंडळ**

बाब क्रमांक : ८९.५ (अ)

विषय- मुं.इ.दु.व पु.मंडळाने ऑगस्ट-२००२ पासून प्रशासकीय मान्यता दिलेल्या दुरुस्ती कामांच्या प्रगतीबाबतचा गोषवारा.
--- अनुपालन अहवाल.

----------------------

सदर अनुपालन अहवाल पृ.क्र.२०९ ते २२३ वर माहितीसाठी सादर करण्यात आला आहे.

उपमुख्य अभियंता (दक्षिण) यांनी सदर माहितीच्या अनुषंगाने असे सांगितले की, मंडळाच्या मागील बैठकीत ठरल्यानुसार दक्षिण परिमंडळातील ज्या इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या नकाशे व अंदाजपत्रकांना मंडळाने ऑगस्ट-२००२ पासून प्रशासकीय मंजूरी प्रदान केली आहे अशा दुरुस्ती कामांच्या प्रगतीबाबतचा अनुपालन अहवाल मंडळाच्या माहितीसाठी सादर करण्यात आला आहे. हयापैकी काही दुरुस्ती कामांमध्ये निविदा अतिशय कमी उणे दराने (३० ते ४० टक्के उणे) भरल्याने सदर निविदा मंडळाच्या मागील बैठकीतील निर्णयानुसार रद्द करुन नव्याने निविदा मागवाव्या लागल्या . काही कामांच्या निविदा दोनदा रद्द करुन नव्याने निविदा मागवाव्या लागल्या. त्यामुळे अशा इमारतींच्या दुरुस्तीची कामे सुरु होण्यास विलंब झालेला आहे. काही प्रकरणांमध्ये अतिशय कमी उणे दराने निविदा भरल्या असल्या तरी अत्यावश्यकतेमुळे अशा निविदा मंजूर करुन कामे सुरु करण्यात आली आहेत. अतिशय कमी उणे दराच्या कामांमध्ये अशी कामे सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांना किंवा मजूर सहकारी संस्थांना देण्याबाबतही विचार करण्यात आला होता. परंतु दुरुस्तीची कामे ही विशिष्ट कौशल्याची असल्याने आतापर्यंत आपण दुरुस्तीची कामे सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांना किंवा मजूर सहकारी संस्थांना दिलेली नाहीत.

मा. सदस्य श्री.सचिन सावंत हयांनी तदनुंषंगाने अशी विचारणा केली की, दुरुस्तीची कामे सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांना किंवा मजूर सहकारी संस्थांना दिल्यास त्यामध्ये कोणता फरक पडू शकतो? तदनुसार उपमुख्य अभियंता (पुनर्रचना) हयांनी असे प्रतिपादन केले की, अशी कामे आपण सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांना किंवा मजूर सहकारी संस्थांना अटवार निविदा अधिक्याने (ना नफा ना तोटा पध्दतीवर) द्यावी

लागतील. दुरुस्तीची कामे ही विशिष्ट प्रावीण्याची/कौशल्याची असल्याने आतापर्यंत अशी कामे सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांना किंवा मजूर सहकारी संस्थांना दिलेली नाहीत. दुरुस्ती काम सुरु केल्यानंतर सदर काम मध्येच बंद पडल्यास अशी कामे सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांना किंवा मजूर सहकारी संस्था पूर्ण करु शकतील किंवा नाही हयाबाबत संभ्रम निर्माण होतो तसेच अशा सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांना किंवा मजूर सहकारी संस्थांवर कोणतेही नियंत्रण नसते. त्यामुळेच आतापर्यंत आपण दुरुस्तीची कामे सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांना किंवा मजूर सहकारी संस्थाना दिलेली नाही.

उपमुख्य अभियंता (दक्षिण) यांनी तदनंतर असे प्रतिपादन केले की, ब-याच वेळा दुरुस्तीची कामे देण्याबाबत सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांनी विनंती केलेली आहे. सध्या ठेकेदार अतिशय कमी उणे दराने निविदा भरत असल्याने दुरुस्तीची कामे सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांना देण्याबाबत विचार करावा लागेल.

मा. सभापती यांनी तदनुंषंगाने असे प्रतिपादन केले की, अशी कामे सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांना दिल्यानंतर सुशिक्षित बेरोजगार अभियंता हे दुरुस्ती कामात निष्णात नसल्याने त्यायमध्ये काही पेचप्रसंग निर्माण झाल्यास त्यात फार अडचणी निर्माण होण्याची शक्यता नाकारता येणार नाही.

मा. सदस्य श्री.बाप्पा सावंत हयांनी तदनुंषंगाने असे प्रतिपादन केले की, सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांच्या सह. संस्था शासनाने तयार केल्या आहेत व अशा सह. संस्थांना शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये व म.न.पा.मध्ये कामे दिली जात असल्याने उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्तीचीही कामे अशा सह. संस्थांना देण्यास हरकत नसावी.

मा. सदस्य श्री. विश्वास मोकाशी हयांनी तदनंतर अशी विचारणा केली की, हयाबाबत मंडळाने कोणता निर्णय घ्यावयाचा आहे? उपमुख्य अभियंता (दक्षिण) यांनी तदनुंषंगाने असे प्रतिपादन केले की, हयाबाबत निर्णय घेण्यासाठी हा प्रस्ताव मंडळापुढे सादर केलेला नसून मंडळाच्या मागील बैठकीत ठरल्यानुसार हा अनुपालन अहवाल माहितीसाठी सादर करण्यात आला आहे. अति उणे दराच्या निविदा पुन्हा मागविल्या जातील व तदनंतर त्याबाबतचा सविस्तर प्रस्ताव मंडळाच्या निर्णयासाठी सादर केला जाईल.

मा. सदस्य श्री.सचिन सावंत हयांनी तदनुंषंगाने असे प्रतिपादन केले की, जास्तीत जास्त उणे किंवा अधिक १५ टक्के दराच्या निविदा मंजूर केल्या जातील अशी स्पष्ट कल्पना ठेकेदारांना दिल्यास ते त्यापेक्षा कमी दराच्या निविदा भरणार नाहीत. उपमुख्य अभियंता (दक्षिण) यांनी तदनुंषंगाने असे प्रतिपादन केले की, जास्तीत जास्त उणे किंवा अधिक १५ टक्के दराच्या निविदा मंजूर केल्या जातील असे आपण ठेकेदारांना कळवू शकत नाही.

वरील सविस्तर चर्चेअंती सदर माहितीची नोंद मा. सभापती व सर्व सन्मा. सदस्यांनी घेतली.

--------------------oo---------------

**बाब क्रमांक :८९.५ (ब)**

विषय- दक्षिण परिमंडळातील उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती
कामांच्या मुळ/सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना
प्रशासकीय मंजूरी प्रदान देणेबाबत.

------------------------------

दक्षिण परिमंडळातील एकूण २७ इमारतींच्या दुरुस्ती कामांची मुळ/सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना प्रंशासकीय मंजूरी प्रदान करण्याचे प्रस्ताव पृ.क्र. २२५ ते २८५ वर सादर करण्यात आले आहेत.

उपमुख्य अभियंता (द.) हयांनी सदर प्रस्तावांच्या अनुषंगाने असे प्रतिपादन केले की, दक्षिण परिमंडळातील **ए**. विभागातील ३, **बी** विभागातील ५, **सी १-२** विभागातील ४, सी-**३-४** विभागातील **३, डी-१** विभागातील ८, **डी-२** विभागातील ४ अशा एकूण २७ इमारतींच्या दुरुस्ती कामांची मूळ/सुधारित नकाशे व अंदाजपत्रके प्रशासकीय मंजूरीसाठी सादर करण्यात आली आहेत.

सविस्तर चर्चेअंती दक्षिण परिमंडळातील एकूण २७ इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ/सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याचे सर्वानुमते ठरले.

**ठराव क्रमांक : ८९/६९६**

**दक्षिण परिमंडळातील एकूण २७ उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ/सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना सोबत जोडलेल्या "परिशिष्ट-ब" प्रमाणे प्रशासकीय मंजूरी सर्वानुमते प्रदान करण्यात आली.**

----------ooo-----------

**बाब क्रमांक : ८९/५ (क)**

विषय- इ.क्र.२७३-२८१,फॉकलंड रोड, डी-२ विभाग मुंबई हया इमारतीस म्हाड अधिनियमांतर्गत ८८ (३) (अ) नुसार प्रमाणपत्र जारी करण्याबाबत.

....................................

सदर प्रस्ताव पृ.क्र.२८७ ते २९१ वर सादर करण्यात आला आहे.

सदर प्रस्तावांच्या अनुषंगाने उपमुख्य अभियंता (द.) हयांनी असे प्रतिपादन केले की, ही इमारत दुरुस्तीसाठी मंडळाने हाती घेतली असून दुरुस्ती खर्चाचा दर रु.३२५०.०० प्रति चौ.मी. आहे. रु.१०००/- प्रति चौ.मी. वरील जादा रक्कम मंडळाकडे भरण्यास रहिवाशांनी असमर्थता दर्शविली आहे. त्यामुळे सदर इमारत म्हाड अधिनियम १९७६ च्या कलम ८८ (३) (अ) नुसार दुरुस्ती मर्यादे पलिकडे घोषित करण्याचा प्रस्ताव मंडळापुढे सादर केला आहे. वास्तुशास्त्रज्ञांनी सादर केलेल्या अहवालानुसार हया इमारतीची पुनर्बांधणी योजना राबविणे शक्य असून नवीन इमारतीत जून्या इमारतीतील ३८ गाळयांपेक्षा ६ गाळे कमी होतील .

सविस्तर चर्चेअंती विषयांकित इमारत म्हाड अधिनियम १९७६ च्या कलम ८८ (३) (अ) नुसार घोषित केल्यास सर्वानुमते मंजूरी देण्याचे ठरले.

-----------------oo-----------------

**ठराव क्रमांक : ८९/६९७**

**इ.क्र.२७३-२८१, पठ्ठे बापूराव मार्ग (फॉकलंड रोड) बादशाह बिल्डिंग, डी. विभाग, मुंबई ही इमारत म्हाड अधिनियम १९७६ च्या कलम ८८ (३) (अ) प्रमाणपत्रानुसार दुरुस्ती खर्चाच्या प्रमाणित मर्यादे पलिकडे घोषित करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.**

-------------oo-----------

बाब क्रमांक ८९.५ (ड) ३१

विषय- इ.क्र.२५२, नरसी नाथा स्ट्रीट, बी. विभाग या इमारतीच्या सद्या अस्तित्वात असलेल्या तळ मजल्याच्या दुरुस्तीसाठी ना हरकत प्रमाणपत्र (विना परतावा) देणेबाबत.

---------------

सदर प्रस्ताव पृ.क्र.२९१ (अ) वर सादर करण्यात आला आहे.

सदर प्रस्तावांच्या अनुषंगाने उपमुख्य अभियंता (द.) हयांनी असे प्रतिपादन केले की, विषयांकित इमारत ही तळ + 3 + ४ (अंशतः) मजल्यांची होती. सदर इमारत धोकादायक असल्याने सन १९७६ मध्ये तळ मजला सोडून हया इमारतीचे वरील सर्व मजले पाडण्यात आले आहेत. सदर इमारत व त्या शेजारील इ.क्र.२५० यांची संयुक्त पुनर्बांधणी योजना मंडळाने प्रस्तावित केली आहे. नियोजित इमारतीच्या नकाशांना म.न.पा. ने मंजूरी दिली आहे. मात्र सदर मालमत्ता मंडळाने अद्याप संपादित केलेली नाही. विषयांकित इमारतीचा तळ मजला सध्या अस्तित्वात असून तीन अनिवासी गाळेधारक रहिवाशी तेथे रहात आहेत. हया तळ मजल्याच्या छताच्या काही भागाची दुरुस्ती आवश्यक असल्याने गाळेधारकांनी सदर दुरुस्तीसाठी ना हरकत प्रमाणपत्र (विना परतावा) देण्याची विनंती केलेली आहे व त्यासाठी सदर प्रस्ताव मंडळापुढे सादर केलेला आहे.

मा. सभापती व मा. सदस्य श्री सचिन सावंत हयांनी अशी विचारणा केली की, मंडळाने हाती घेतलेल्या पुनर्बांधणी योजनेची सद्यःस्थिती काय आहे ? तद्नुषंगाने उपमुख्य अभियंता (पुनर्र.) हयांनी असे प्रतिपादन केले की, इ.क्र.२५०, नरसी नाथा स्ट्रीट ही इमारत उपकरप्राप्त नसल्याने सदर इमारतीस म्हाड अधिनियम १९७६ च्या कलम ८८ (३) (ब) प्रमाणपत्र जारी केलेले आहे.

मा. सभापती हयांनी हयाबाबत अशा सूचना दिल्या की, सदर प्रस्ताव पुनर्बांधणी योजनेच्या सध्यस्थितीसह मंडळाच्या पुढील बैठकीत फेर सादर करावा.

**सहकार कक्ष**

**सहकारी गृहनिर्माण संस्थेकरिता कलम १०३-ब अन्वयें भूसंपादन करण्याचे प्रस्ताव.**

१) कच्ची हाऊस पलॉट नं.१७, के.ए. सुब्रमणियम रोड, माटुंगा, मुंबई-१९ येथील भूखंड व त्यावरील इमारतीस नियोजित **शिव-गणेश** स.गृ.नि. संस्था,

२) पानवाला चाळ क्र.३, ७५-बी, डॉ.एस.एस.रोड, परळ, मुंबई-१२ येथील भूखंड व त्यावरील इमारतीस नियोजित **पानवाला चाळ** स.गृ.नि. संस्था,

३) जरीवाला बिल्डिंग,३१ए, सदाशिव क्रॉस लेन, गिरगाव, मुंबई-०४ येथील भूखंड व त्यावरील इमारतीस नियोजित **सिध्दीविनायक** स.गृ.नि. संस्था,

४) राम कुंज, १२६, डॉ.एम.बी.राऊत रोड, शिवाजी पार्क, दादर, मुंबई-२८ येथील भूखंड व त्यावरील इमारतीस नियोजित **राम कुंज** स.गृ.नि. संस्था,

५) अनिल भवन, १९४-१९४, एच.जेरबी वाडीया रोड, परळ, मुंबई-१२ येथील भूखंड व त्यावरील इमारतीस नियोजित **वैभव** स.गृ.नि. संस्था,

६) बाळकृष्ण निवास, ५४-६२ पांजरपोळ लेन, सी.पी.टँक, मुंबई-०४ येथील भूखंड व त्यावरील इमारतीस नियोजित **श्री बाळकृष्ण** स.गृ.नि. संस्था,

सदर प्रस्ताव पृ.क्र.२९३ ते ३५१ वर सादर करण्यात आले आहेत.

सदर प्रस्तावांच्या अनुषंगाने का.अ. /स.सं.कक्ष हयांनी असे प्रतिपादन केले की, हया सर्व सहा प्रस्तावांमध्ये ७० टक्क्यापेक्षा अधिक रहिवाशांनी संमती दिलेली आहे. पानवाला चाळ, जरीवाला बिल्डिंग, बाळकृष्ण निवास हया तीन इमारतींच्या प्रस्तावातील रहिवाशांच्या यादीमध्ये नमूद केलेले चटईक्षेत्र (कारपेट एरिया) हे चौ.फू. असे वाचावे. हे सर्व प्रस्ताव शासनाकडे भूसंपादन कार्यवाहीस मंजूरी देण्यास्तव सादर करण्याचा प्रस्ताव असून त्यास मंडळाच्या मंजूरीसाठी हे प्रस्ताव सादर करण्यात आले आहेत.

सविस्तर चर्चेअंती सदर प्रस्ताव शासनाकडे भूसंपादन कार्यवाहीस मंजूरी देण्यासाठी सादर करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्याचे ठरले.

---------------oo--------------

**ठराव क्रमांक : ८९/६९८**

**म्हाड अधिनियम १९७६ च्या कलम १०३-ब अन्वये खालील सहा प्रस्ताव भूसंपादनाच्या कार्यवाहीस मंजूरी देण्यासाठी शासनाकडे सादर करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.**

१) कच्ची हाऊस पलॉट नं.१७, के.ए. सुब्रमणियम रोड, माटुंगा, मुंबई-१९ येथील भूखंड व त्यावरील इमारतीस नियोजित **शिव-गणेश** स.गृ.नि. संस्था,

२) पानवाला चाळ क्र.३, ७५-बी, डॉ.एस.एस.रोड, परळ, मुंबई-१२ येथील भूखंड व त्यावरील इमारतीस नियोजित **पानवाला चाळ** स.गृ.नि. संस्था,

३) जरीवाला बिल्डिंग,३१ए, सदाशिव क्रॉस लेन, गिरगाव, मुंबई-०४ येथील भूखंड व त्यावरील इमारतीस नियोजित **सिध्दीविनायक** स.गृ.नि. संस्था,

४) राम कुंज, १२६, डॉ.एम.बी.राऊत रोड, शिवाजी पार्क, दादर, मुंबई-२८ येथील भूखंड व त्यावरील इमारतीस नियोजित **राम कुंज** स.गृ.नि. संस्था,

५) अनिल भवन, १९४-१९४, एच.जेरबी वाडीया रोड, परळ, मुंबई-१२ येथील भूखंड व त्यावरील इमारतीस नियोजित **वैभव** स.गृ.नि. संस्था,

**६)** ०बाळकृष्ण निवास, ५४-६२ पांजरपोळ लेन, सी.पी.टँक, मुंबई-०४ येथील भूखंड व त्यावरील इमारतीस नियोजित **श्री बाळकृष्ण** स.गृ.नि. संस्था,

------------oo----------

बाब क्रमांक : ८९.६ (१)

विषय- मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या दि. ७.४.२००३ च्या
बैठकीतील बाब क्र. ८८.६ अतिरिक्त ५ टक्के सूट देण्याबाबत.
--- ५, प्लॅनेट मिल लेन बोरी चाळ, लोअर परेल, मुंबई.
..........................

सदर प्रस्ताव पृ.क्र.३५३ वर सादर करण्यात आला आहे.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने सहमुख्य अधिकारी/दुवपु हयांनी असे प्रतिपादन केले की, मंडळाच्या दि.७.४.२००३ रोजीच्या बैठकीत २२५.०० चौ.फू. पेक्षा ५ टक्केपर्यंतच्या (११.२५ चौ.फू. साठी) अधिकच्या क्षेत्रफळास सूट देण्याबाबत ठराव क्र.८८/६८५ संमत केलेला आहे. मात्र हया इमारतीमध्ये एकूण ९ गाळे असे आहेत की, ज्यांचे अधिकचे क्षेत्रफळ हे १२.००चौ.फू. असून ते ५ टक्क्यापेक्षा ०.७५ चौ.फू.ने अधिक आहे जे अगदी नगण्य आहे. त्यामुळे अशा गाळयांना ०.७५ चौ.फू. अतिरिक्त क्षेत्रफळासाठी किंमत आकारावी किंवा कसे हयाबाबत निर्णय घेण्यासाठी हा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

मा.सभापती हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, मंडळाच्या मागील बैठकीत ठरल्यानुसार २२५.०० चौ.फू. पेक्षा ५ टक्केपर्यंतच्या अधिकच्या क्षेत्रफळास सूट देऊन त्यापेक्षा अधिक असणा-या क्षेत्रफळास बाजारभावाप्रमाणे किंमत वसुल करावी असा निर्णय घेण्यात आला आहे. मात्र हया निर्णयाचा अर्थ असा लावला गेला आहे की, ज्या गाळयांचे क्षेत्रफळ ५ टक्क्यापेक्षा अधिक आहे अशा अतिरिक्त क्षेत्रफळासाठी ५ टक्के सूट न देता संपूर्ण अधिकच्या क्षेत्रफळासाठी बाजारभावाने किंमत वसुल करावी. वस्तुतः ज्या गाळयांचे क्षेत्रफळ हे २२५.०० चौ.फू. पेक्षा अधिक आहे त्या सर्वच गाळयांना ५ टक्केपर्यंत सूट देण्याचा निर्णय निर्णय झालेला आहे. ५ टक्क्यापेक्षा जर १ चौ.फू. पेक्षा जास्त क्षेत्रफळ असेल तर १ चौ.फू. साठी बाजारभावाने किंमत आकारावयाची आहे. त्यामुळे प्रस्तावित ९ गाळयांचे क्षेत्रफळ हे ५ टक्क्यापेक्षा ०.७५ चौ.फू. ने जास्त असेल तर अशा ०.७५ चौ.फू.साठी बाजारभावाने किंमत आकारावी लागेल. व हयाच निर्णयाप्रमाणे पंतप्रधान अनुदान प्रकल्पांतर्गत बांधलेल्या इमारतींसाठीही लागू रहाणार आहे.

सविस्तर चर्चेअंती ५ टक्क्यापेक्षा ०.७५ चौ.फू. ने जास्त असलेल्या क्षेत्रफळास बाजारभावाने किंमत आकारण्यास सर्वानुमते मंजूरी देण्याचे ठरले.

---------------oo---------------

**ठराव क्रमांक : ८९/६९९**

**पंतप्रधान अनुदान प्रकल्पांतर्गत बांधलेल्या तसेच मंडळाने बांधलेल्या ज्या इमारतींमधील गाळयांचे अधिकचे क्षेत्रफळ ५ टक्क्यापेक्षा अधिक असेल अशा ५ टक्क्यापेक्षा अधिक असणा-या क्षेत्रफळास बाजारभावाने किंमत आकारण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.**

------------------------

बाब क्रमांक ८९.६ (२)

विषय- मुं.इ.दु.व पु.मंडळाच्या दइमारतीतील ब-याच वर्षांपासून रिक्त असलेल्या निवासी/अनिवासी गाळे खुल्या बाजारभावाने विक्री करण्याबाबतचा प्रस्ताव.

------------------------

सदर प्रस्ताव पृ.क्र.३५५ वर सादर करण्यात आला आहे.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने सहमुख्य अधिकारी/दु.व पु. मंडळ हयांनी असे प्रतिपादन केले की, मंडळाने बांधलेल्या काही इमारतींमध्ये १०१ निवासी व ४८ अनिवासी गाळे असे आहेत की, त्यांचा आकार वेडावाकडा, त्रिकोणी आहे किंवा त्यांचे क्षेत्रफळ हे २२५.०० चौ.फू. पेक्षा कमी आहे. हयामुळे सदर गाळे घेण्यास कोणीही

तयार नसल्याने हे गाळे ब-याच वर्षांपासून रिक्त आहेत. त्यामुळे हया गाळयांमध्ये घुसखोरी होऊन त्यांचा गैरवापर होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे हे सर्व गाळे खुल्या बाजारात विक्री करण्याचा प्रस्ताव मंडळाच्या मागील बैठकीत सादर करण्यात आला होता. त्यावेळी असे ठरले होते की, हया गाळयांची यादी त्यांच्या ठावठिकाणासह व तेथील बाजारभावाच्या दरासह सादर करुन सदर प्रस्ताव फेर सादर करावा. त्यानुसार हा प्रस्ताव मंडळापुढे फेर सादर करण्यात आला आहे. हया प्रस्तावाबरोबर रिक्त गाळयांची यादी मंडळाने पूर्वी मंजूर केलेल्या दरांसह पटलावर सादर केली असून हया दराने हे गाळे घेण्यास कोणीही तयार नाही त्यामुळे हे दर कमी करण्याबाबत विचार होणे आवश्यक आहे.

मा.सभापती व मा. सदस्य श्री. बाप्पा सावंत हयांनी तदनुषंगाने अशी विचारणा केली की, यादीमध्ये जे दर नमूद केले आहेत ते रेडी रिकेनरप्रमाणे व तेथील बाजारभावाप्रमाणे आहेत किंवा कसे ? तदनुसार सहमुख्य अधिकारी हयांनी असे प्रतिपादन केले की, यादीमध्ये नमूद केलेले दर हे रेडी रिकेनर किंवा तेथील बाजारभावाप्रमाणे नसून मंडळाच्या त्यावेळच्या तांत्रिक समितीने त्यावेळी मंजूरी दिलेले दर आहेत.

मा. सदस्य श्री. बाप्पा सावंत हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, यादीमध्ये नमूद केलेले दर हे योग्य नाहीत तसेच मा. सदस्य श्री. रघुनाथ थवई व मा. सदस्य श्री. विश्वास मोकाशी हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, रिक्त गाळयांची जी यादी दिली आहे ती अर्धवट असून त्यावरुन काही इमारती नेमक्या कोणत्या ठिकाणी आहेत हयाचा बोध होत नाही. काही इमारतींच्या बाजारभावाचा दरही दिलेला नाही.

मा. सदस्य श्री. विश्वास मोकाशी हयांनी तदनंतर असेही सुचविले की, हया इमारतींचा दर निश्चित करण्यासाठी एक समिती गठीत करुन त्या समितीच्या अभिप्रायांनुसार सदर प्रस्ताव फेर सादर करुन नंतर निर्णय घेणे संयुक्तिक होईल.

मा. सभापती हयांनी तदनुषंगाने अशा सूचना दिल्या की, हयासाठी आपण मुख्य अधिकारी हयांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करुन हयाबाबत सदर समितीने दराबाबत सारासार विचार करुन त्याबाबतच्या शिफारशी प्रस्तावासह मंडळापुढे फेर सादर करावा. मा. सभापती हयांनी तदनुषंगाने असेही प्रतिपादन केले की, हयाबाबत प्रथम आपण धोरणात्मक निर्णय घ्यावा किंवा कसे हयाबाबतही विचार करावा लागणार आहे. कारण मागील मंडळाने असे काही गाळे पूर्वी खुल्या बाजारात विक्री केल्यानंतर त्याबाबत ताशेरे ओढण्यात आले होते परंतु हे गाळे रिक्त पडून असल्याने ते त्यावेळी मंडळाला आर्थिक उत्पन्न होईल हया दृष्टीकोनातून विकले असावेत. परंतु आपले मंडळ आल्यापासून आपण असे गाळे बृहतसूचीवरील रहिवाशांव्यतिरिक्त अन्य कोणासही दिलेले नाहीत व नियमानुसार आपण बृहतसूचीवरील रहिवाशांव्यतिरिक्त अन्य कोणासही असे गाळे विकू शकत नाही. त्यामुळे धोरणात्मक निर्णय घेताना हया मुद्दयाचाही विचार करावा लागणार आहे. त्यामुळे हया सर्व बाबींचा विचार करुन सदर प्रस्ताव मंडळापुढे फेर सादर करण्याच्या सूचना मा. सभापती हयांनी दिल्या.

----------------oo-------------

बाब क्रमांक : ८९.७ 

**मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी ठेवावयाचे प्रस्ताव.**

१) विषय: बोरीवली झुंजार मित्र मंडळ, म.हा.बोर्ड कॉलनी, बोरीवली (प.) मुं.९२. या विभागांतील कॉलेज विदयार्थी व शाळेतील विदयार्थ्यांना अभ्यासिकेकरिता जागा मिळणेबाबत.

सदर प्रस्ताव मा. अध्यक्षांच्या परवानगीने आपल्या वेळच्या विषयात पटलावर सादर करण्यात आला आहे.

मा. सदस्य श्री. बाप्पा सांवत हयांनी सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने असे प्रतिपादन केले कि, सदर झुंजार मित्र मंडळ हि संस्था नोदंणीकृत असुन विदयार्थांना अभ्यासाकरिता जागा मागितली असल्याने संक्रमण शिबिरातील एक गाळा देण्यास हरकत नसावी. आपण पुर्वी अश्या प्रकारचे गाळे दिले आहेत. हया प्रस्तावात रु. ५०००/- डिपॉझीट व तीन वर्षाचे आगाउ भाड घेण्याचे प्रस्तावित केले आहे. आपण हयापुर्वीच्या प्रस्तावांमध्ये ३ वर्षाचे आगाउ भाडे घेतलेले नाहि. दरमहा रू. १००० /- भाडे घेणे योग्य आहे मात्र आगाउ भाडे घेणे योग्य नाही.

सहमुख्य अधिकारी हयांचे तद्नुषंगाने असे प्रतिपादन केले की, ब-याच वेळेस भाडे एक एक वर्ष भरित नसल्याने आपण आगाउ भाडे घेतो. मा. सदस्य श्री. विश्वास मोकाशी हयांनी तद्नुषंगाने असे प्रतिपादन केले की, आपण ५०००/- रूपये डिपॉझीट धेत असल्याने श्रू. २०००/- पर्यंत भाडे थकित झाल्यास हयाबाबत नोटिस पाठवुन कार्यवाही करू शकतो.

मा. सभापती हयांनी तद्नुषंगाने असे सुचविले की, ३ वषाचे आगाउ भाडे न घेता ते खास बाब म्हणुन १ वर्षाचे घ्यावे. मा. सभापती हयांनी तद्नंतर असेही प्रतिपादन केले की, आपण पुर्वी अश्या प्रकारच्या संस्थाकडुन ३ वषाचे आगाउ भाडे घेउन गाळे दिलेले आहेत.

वरील प्रमाणे सदर प्रस्ताव मंजुर करण्याचे सर्वानुमते ठरले.

----------oo-----------

**ठराव क्रमांक : ८९ / ७००**

**बोरीवली (प) एम. एच. बी. कॉलनी, संक्रमण शिबीर, मुंबई ९२. येथील रिक्त गाळा ७/१९३ हा झुंजार मित्र मंडळ यास विदयार्थ्यांच्या अभ्यासाकरिता रू. ५०००/- अनामत रक्कम व दर महा भाडे रू. ६००/- प्रमाणे १ वषाचे आगाउ घेउन वितरण करण्याकरिता सर्वानुमते मंजुरी देण्यात आली.**

------------oo---------------

२) विषय : भुकर पाहणी क्र. ३७० गिरगाव विभाग येथील इमारत क्र. १ ते ११ मुगभाट लेन डी विभाग हया इमारतीच्या पुर्नविकासाबाबत.

-------------------------

सदर प्रस्ताव मा. अध्यक्षांच्या परवानगीने आपल वेळच्या विषयात पटलावर सादर करण्यात आला आहे.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने नि. का. अ. हयांनी असे प्रतिपादन केले की, विषयांकित मालमत्तेच्या पुनर्विकासासाठी मंडळाने दि. २७.०२.२००१ रोजी ना. ह. प्र. पत्र प्रदान केले होते. तद्नंतर हया इमारतीतील काही रहिवाश्यांनी ना.ह.प्र. रदद् करण्याबाबत व काही रहिवाश्यांनी ना. ह. प्र. रदद् न करण्याबाबत याचिका मा. उच्च न्यायालयात सादर केली होती. मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार मंडळाने दि. २७.२.२००१ रोजी दिलेले ना.ह.प्र. दि. २१.०६.२००२ रोजी रदद् केले होते. तद्नंतर ना.ह.प्र. पत्र धारकांनी उच्च न्यायालयाच्या आदेशास आव्हान देणारी याचिका मा. सर्वोच्च न्यायालयाच्या दाखल केली होती. मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केली होती. मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार सदर मालमत्तेचा पुर्नविकास मंडळाने ना.ह.प्र. पत्र धारकामार्फत करण्याबाबतचे आदेश शासनाने दि. २८.०३.२००३ रोजीच्या पत्रान्वये दिले आहेत. हयां आदेशानुसार ना.ह.प्र. धारकांनी जुन्या इमारतीतील सर्व रहिवाश्यांना सामावुन घेवुन एकुण १३४ गाळे (२२५.०० चौ. फुट चटई क्षेत्राचे) मंडळाला विनामुल्य बांधुन दयावयाचे आहेत. त्यानुसार ना. ह.प्र. पत्र धारकांस हया मालमत्तेचा विकास करण्यासाठी परवानगी देण्याचा प्रस्ताव मंडळापुढे सादर केलेला आहे.

मा. सदस्य, श्री. विश्वास मोकाशी हयांनी तद्नुषंगाने असे प्रतिपादन केले की, हे न्यायालयीन प्रकरण असुन आयत्या वेळच्या विषयात हे न्यायालयीन प्रकरण असुन आयत्या वेळच्या विषयात हे प्रकरण सादर न करता हयाबाबत विधी विभागाचे अभिप्राय घेउन हयासह हे प्रकरण मंडळाच्या पुढील बैइकीत फेरसादर करावे.

नि. का.अ. हयांनी तद्नुषंगाने असे प्रतिपादन केले की, हया प्रकरणी मा.सर्वोच्च न्यायालयाने आदेश दिलेले आहेत व त्या आदेशानुसारच हा प्रस्ताव सादर केलेला आहे.

मा. सदस्य श्री. विश्वास मोकाशी हयांनी तद्नुषंगाने असे प्रतिपादन केले की, सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानंतर पुन्हा काही रहिवांश्यानी न्यायालयात याचिका दाखल केली आहे.

उपसचिव महाराष्ट्र शासन हयांनी तद्नुषंगाने असे प्रतिपादन केले कि, हया प्रकरणी शासनाने सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या योजनेस मा. सर्वोच्च न्यायालयाने विकास मंडळ ना.ह.प्र. पत्रधारकामार्फत करणर आहे. फक्त हया योजनेस ७० टक्के रहिवाशांची संमती आहे किंवा नाही हयाची खातरजमा मंडळाने करावयाची आहे.

मा. सदस्य श्री. सचिन सावंत हयांनी तद्नुषंगाने असे प्रतिपादन केले की, हया प्रकरणी घाई करुण निर्णय घेणे संयुक्तिक होणर नाहि त्यामुळे हा प्रस्ताव मंडळाच्या पुढील बैठकीत फेरसादर करावा.

मा. सभापती हयांनी तद्नुषंगाने असे प्रतिपादन केले की, हया प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार कारवाई होणे आवश्यक आहे. मात्र मा. सदस्य श्री. विश्वास मोकाशी हयांनी सांगितल्यानुसार पुन्हा काही रहिवाशांनी न्यायालयात याचिका दाखल केली असेल तर त्याची शहानिशा करावी लागेल. तसेच मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार हया योजनेस ७० टक्के रहिवांशाचीं संमती घेतली आहे किंवा नाही हयाबाबतची खातरजमा करावी लागेल. त्यामुळे हे प्रकरण मुख्य अधिकारी हयांनी कायदेशीर दृष्टिकोनातुन तपासुन तसेच हया योजनेस ७० टक्के रहिवाशांची संमती आहे किंवा नाही हयाबाबतची खातरजमा करून नंतर हा प्रस्ताव मंडळापुढे फेरसादर करावा.

मुख्य अधिकारी हयांनी तद्नुषंगाने असे प्रतिपादन केले की, का.अ. (पु.वि. १) हयांनी ७० टक्के रहिवांशाची संमती प्रत्यक्ष जागेवर तपासुन त्याबाबतचा अहवाल सादर केला आहे.

मा. सदस्य श्री. रघुनाथ थवई व श्री. विश्वास मोकाशी हयांनी तद्नुषंगाने असे प्रतिपादन केले की, ५० टक्के रहिवाशांची संमती घेताना त्यामध्ये काही बोगस रहिवाश्यांनी सहया केल्या असण्याची शक्यता नाकारता येणार

नाही. तसेच रहिवाशांनी पुन्हा मा. न्यायालयात याचिका दाखल केली असल्याने त्याबाबत विधी शाखेचे अभिप्राय घेणे आवश्यक आहे.

मा. सभापती हयांनी तद्नंतर अशी विचारण केली की, शासनाच्या व मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार प्रस्तावित योजनेचा तपशील सर्व रहिवाशांना माहित करून त्याबददुल कोणाचे आशेय असल्यास ते सादर करण्याच्या दृष्टीने सर्व रहिवाशांसमवेत बैठक आयोजित केली होती का

तद्नुसार का. अ. (पु.वि. १) हयांनी असे प्रतिपादन केले की वरीलबाबत सर्व रहिवाशांशी बैठक घेतली असुन सदर योजनेचा तपशील सर्व रहिवाशांना सांगितल्यानंतर ७० टक्कंपेक्षा अधिक रहिवाशांनी त्यांची या योजनेस संमती असल्याबाबतचे शपथपत्रे (ॲफिडेव्हिट) सादर केली आहेत.

मा. सदस्य श्री. ब्बाप्प सांवत हयांनी तद्नुषंगाने असे प्रतिपादन केले की, कोणतेही महत्वाची प्रकरणे मुख्य अधिकारी हयांनी स्वतः तपासुन नंतरच मंडळापुढे सादर करावीत व त्यानुसार हया प्रकरणी ७० टक्के रहिवाशांची या योजनेस संमती आहे किंवा नाही हयांची खातरजमा करावी.

मुख्य अधिकारी हयांनी तद्नुषंगाने असे प्रतिपादन केले की, हया योजनेचा तपशिल सर्व रहिवाशांना सागंण्याच्या दृष्टिने जी बैइक घेतली होती त्या बैठकीनंतर ७० टक्यांपेक्षा जास्त रहिवाश्यांनी ज्यांची हया योजनेस संमती असल्याची शपथपत्रै (ॲफिडेव्हीट) सादर केलेली आहेत.

मा. सभापती हयांनी तद्नुषंगाने असे प्रतिपादन केले की, मुख्य अधिकारी हयांनी स्वःत ते प्रकरण कायदेशीररित्या तपासुन त्यांच्या स्तरावर निर्णय घ्यावा व त्याची माहिती नंतर मंडळापुढे सादर करावी.

३) विषय : मुंबई बेटावरील उपकरप्राप्त इमारतींच्या पुर्नविकासाठी ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याचे प्रस्ताव.

--------------------

मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळच्या विषयामध्ये मुंबई बेटावरील उपकरप्राप्त इमारतींच्या पुर्नविकासाठी ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याचे खालील १४ प्रस्ताव पटलावर मंजुरीसाठी सादर करण्यात आले आहेत.

१) अंतिम भूखंड क्र.४९, नगर रचना योजना क्र.३, माहिम विभाग, विभाग क्र. जीएन-४१५८ (६) इ.क्र. ११ वाय रोड साऊथ (बाई पदमाबाई ठक्कर रोड) दादर (प.) मुंबई येथील "म्हात्रे निवास" म्हणून ओळखल्या जाणा-या मालमत्तेच्या पुर्नविकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

२) भुकर पहाणी क्र.१४१८,मांडवी विभाग, उपकर क्र.बी-२६६९-७० इ.क्र.८९-९१ झकेरिया मस्जिद स्ट्रीट, मुंबई येथील "पॅन्ड्रोवाला मंझील" हया मालमत्तेच्या पुर्नविकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

३) भुकर पहाणी क्र.२१०ए/१० माटुंगा विभाग भूखंड क्र.२६६ ए, दादर माटूंगा विभाग, विभाग क्र. एफएन-७०६२ (१ए), इ.क्र. २१, देवधर रोड, माटुंगा, मुंबई येथील "उमा निवास" म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुर्नविकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

४) भुकर पहाणी क्र.३३२ ताडदेव विभाग, विभाग क्र.डी-४०६२, ४५९९ व ४६३१, ४६०१, ४५९५-९६ व डी-४५९२, इ.क्र.३०-४२, ३०ए, ४४-८० व ८० ए, दादासाहेब भडकमकर मार्ग, मुंबई येथील " हाजी कासम चाळ " म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुर्नविकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

४५

५) भुकर पहाणी क्र. २२६८,भुलेश्वर विभाग, उपकर क्र.सी-४९९५-९६ इ.क्र.३७३,खत्तरअली लेन, ४५, ठाकूरव्दार, मुंबई येथील "गोवर्धन निवास" म्हणून ओळखल्या जाणा-या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ''ना हरकत प्रमाणपत्र'' प्रदान करण्याबाबत.

६) भुकर पहाणी क्र., २२६९, भुलेश्वर विभाग, विभाग क्र.सी-४९९२-९४ इ.क्र. ५-५ ए, दुसरी खत्तर अल्ली लेन ,मुंबई येथील "सक्सेरिया बिल्डिंग" म्हणून ओळखल्या जाणा-या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ''ना हरकत प्रमाणपत्र'' प्रदान करण्याबाबत.

७) भुकर पहाणी क्र., १/६०३ गिरगाव विभाग, विभाग क्र.डी-१६३१ (२), इ.क्र.२२६,बी, व्ही.पी.रोड, टोपीवाला वाडी, गिरगाव, मुंबई येथील "चौकळशी ज्ञाती गृह" म्हणून ओळखल्या जाणा-या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ''ना हरकत प्रमाणपत्र'' प्रदान करण्याबाबत.

८) भुकर पहाणी क्र., २९४५, भुलेश्वर विभाग, विभाग क्र.सी-६६२१, इ.क्र.४२ दुसरी कारपेंटर स्ट्रीट, हया मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ''ना हरकत प्रमाणपत्र'' प्रदान करण्याबाबत.

९) भुकर पहाणी क्र., ३३६५ व ३३६६ भुलेश्वर विभाग, विभाग क्र.सी-६२५४, इ.क्र.८-१४-१४ ए, घोघारी मोहल्ला, मुंबई येथील '' दरवेश मंझील '' म्हणून ओळखल्या जाणा-या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याबाबत.

१०) भुकर पहाणी क्र.३/१७६४, भायखळा विभाग, विभाग क्र.ई-३९२३ (५) इ.क्र.७-७ ए, ९, बदलू रंगारी लेन नं.३, भायखळा, मुंबई येथील "बंदुकवाला चाळ" म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याबाबत.

११) भुकर पहाणी क्र.२२२६, भुलेश्वर विभाग, विभाग क्र.सी-४३८०-८२ इ.क्र.१२,धसवाडी, ठाकूरव्दार, मुंबई येथील "गवांदे बिल्डिंग" म्हणून ओळखल्या जाणा-या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ''ना हरकत प्रमाणपत्र'' प्रदान करण्याबाबत.

१२) भुकर पहाणी क्र., १९७५, भुलेश्वर विभाग, विभाग क्र.सी-४२४५-४६ इ.क्र.३७३,जे.एस.एस.रोड, ठाकूरव्दार, मुंबई येथील "झावबा हाऊस" म्हणून ओळखल्या जाणा-या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ''ना हरकत प्रमाणपत्र'' प्रदान करण्याबाबत.

१३) भुकर पहाणी क्र., ६४२, गिरगाव विभाग, विभाग क्र.डी-१५९०(१), इ.क्र.१०, डॉ. देशमुख लेन, गिरगाव, मुंबई येथील "विठ्ठल भूवन" म्हणून ओळखल्या जाणा-या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ''ना हरकत प्रमाणपत्र'' प्रदान करण्याबाबत.

१४) भुकर पहाणी क्र., १०७१ गिरगाव विभाग, विभाग क्र.डी-१८३९ (१), १८४० (२) १८४० (३) १८४० (१ए) व १८४० (१) इ.क्र.१९९, १९५-१९७, २०१-२०१डी, १९९सी व १९९बी, खेतवाडी मेन रोड, गिरगाव, मुंबई हया मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ''ना हरकत प्रमाणपत्र'' प्रदान करण्याबाबत.

१५) भुकर पहाणी क्र.१/१४६५, गिरगाव विभाग, उपकर क्र.डी-११८५ इ.क्र.१०, गोरेगावकर लेन,गिरगाव, मुंबई येथील "प्रफुल्ल का.ऑप.हौ.सो.लि." म्हणून ओळखल्या जाणा-या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ''ना हरकत प्रमाणपत्र'' प्रदान करण्याबाबत.

सदर प्रस्तावांच्या अनुषंगाने मा. सभापती हयांनी असे प्रतिपादन केले की, हया सर्व प्रस्तावांमध्ये ७० टक्के पेक्षा अधिक रहिवाशांची संमती असुन ना.ह.प्र. पत्र प्रदान करण्यास हरकत नसावी.

मा. सदस्य श्री. बाप्पा सावंत हयांनी तद्नुषंगाने असे प्रतिपादन केले की, मंडळाच्या मागील बैठकीत सादर केलेल्या गिरगाव मुंबई येथील भु.पा.क्र. १/१४६५ गिरगाव विभाग येथील प्रफुल्ल को. ऑप. हौ.सो. पुनर्विकासाचा प्रस्ताव प्रलंबित ठेवण्यात आला होता.सदर प्रस्तावाची छाननी केल्यानंतर असे आढळुन येते की, हया मालमत्तेचा पुनर्विकास इमारतीतील रहिवाशांची सह. गृह संस्था करणार आहे. त्यामुळे हया प्रस्तावामध्येही ना.ह.प्र. पत्र नंतर करण्यास हरकत नसावी.

सविस्तर चर्चेअंती मुंबई बेटावरील खालिल १५ मालमत्तांवरील उपकरप्राप्त इमारतीच्या पुर्नविकासाठी ना.ह.प्र. पत्र देण्याचे सर्वानुमते ठरल.

-------------oo---------------

**ठराव क्रमाक्र. ८९/ ७०१**

**मुंबई बेटावरील खालील १५ मालमत्तांची उपकरप्राप्त इमारतीच्या पुर्नविकासाठी प्रस्तावात नमुद केलेल्या अटी व शर्तीच्यां अधिन राहुन ना.ह.प्र. पत्र प्रदान करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली.**

१) अंतिम भूखंड क्र.४९, नगर रचना योजना क्र.३, माहिम विभाग, विभाग क्र. जीएन-४१५८ (६) इ.क्र. ११ वाय रोड साऊथ (बाई पदमाबाई ठक्कर रोड) दादर (प.) मुंबई येथील "म्हात्रे निवास"

२) भुकर पहाणी क्र.१४१८,मांडवी विभाग, उपकर क्र.बी-२६६९-७० इ.क्र.८९-९१ झकेरिया मस्जिद स्ट्रीट, मुंबई येथील "पॅन्ड्रोवाला मंझील"

३) भुकर पहाणी क्र.२१०ए/१० माटुंगा विभाग भूखंड क्र.२६६ ए, दादर माटूंगा विभाग, विभाग क्र. एफएन-७०६२ (१ए), इ.क्र. २१, देवधर रोड, माटुंगा, मुंबई येथील "उमा निवास"

४) भुकर पहाणी क्र.३३२ ताडदेव विभाग, विभाग क्र.डी-४०६२, ४५९९ व ४६३१, ४६०१, ४५९५-९६ व डी-४५९२, इ.क्र.३०-४२, ३०ए, ४४-८० व ८० ए, दादासाहेब भडकमकर मार्ग, मुंबई येथील " हाजी कासम चाळ "

५) भुकर पहाणी क्र. २२६८,भुलेश्वर विभाग, उपकर क्र.सी-४९९५-९६ इ.क्र.३७३,खत्तरअली लेन, ४५, ठाकूरव्दार, मुंबई येथील "गोवर्धन निवास"

६) भुकर पहाणी क्र., २२६९, भुलेश्वर विभाग, विभाग क्र.सी-४९९२-९४ इ.क्र. ५-५ ए, दुसरी खत्तर अल्ली लेन ,मुंबई येथील "सक्सेरिया बिल्डिंग"

७) भुकर पहाणी क्र., १/६०३ गिरगाव विभाग, विभाग क्र.डी-१६३१ (२), इ.क्र.२२६,बी, व्ही.पी.रोड, टोपीवाला वाडी, गिरगाव, मुंबई येथील "चौकळशी ज्ञाती गृह"

८) भुकर पहाणी क्र., २९४५, भुलेश्वर विभाग, विभाग क्र.सी-६६२१, इ.क्र.४२ दुसरी कारपेंटर स्ट्रीट.

९) भुकर पहाणी क्र., ३३६५ व ३३६६ भुलेश्वर विभाग, विभाग क्र.सी-६२५४, इ.क्र.८-१४-१४ ए, घोघारी मोहल्ला, मुंबई येथील " दरवेश मंझील "

१०) भुकर पहाणी क्र.३/१७६४, भायखळा विभाग, विभाग क्र.ई-३९२३ (५) इ.क्र.७-७ ए, ९, बदलू रंगारी लेन नं.३, भायखळा, मुंबई येथील "बंदुकवाला चाळ"

११) भुकर पहाणी क्र.२२२६, भुलेश्वर विभाग, विभाग क्र.सी-४३८०-८२ इ.क्र.१२,धसवाडी, ठाकूरव्दार, मुंबई येथील "गवांदे बिल्डिंग"

१२) भुकर पहाणी क्र., १९७५, भुलेश्वर विभाग, विभाग क्र.सी-४२४५-४६ इ.क्र.३७३,जे.एस.एस.रोड, ठाकूरव्दार, मुंबई येथील "झावबा हाऊस" म्हणून ओळखल्या जाणा-या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

१३) भुकर पहाणी क्र., ६४२, गिरगाव विभाग, विभाग क्र.डी-१५९०(१), इ.क्र.१०, डॉ. देशमुख लेन, गिरगाव, मुंबई येथील "विठ्ठल भूवन"

१४) भुकर पहाणी क्र., १०७१ गिरगाव विभाग, विभाग क्र.डी-१८३९ (१), १८४० (२) १८४० (३) १८४० (१ए) व १८४० (१) इ.क्र.१९९, १९५-१९७, २०१-२०१डी, १९९सी व १९९बी, खेतवाडी मेन रोड, गिरगाव, मुंबई

१५) भुकर पहाणी क्र.१/१४६५, गिरगाव विभाग, उपकर क्र.डी-११८५ इ.क्र.१०, गोरेगावकर लेन,गिरगाव, मुंबई येथील "प्रफुल्ल का.ऑप.हौ.सो.लि."

मा. सभापती हयांनी तदनंतर असे प्रतिपादन केले की, सन्मा. मुख्य मंत्री, उपमुख्य मंत्री, अर्थ मंत्री, प्रधान सचिव व शासनाने मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळासाठी या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकामध्ये चांगल्याप्रकारे आर्थिक तरतुद करुन निधीही उपलब्ध करुन दिला आहे. हयाबाबतचा प्रचार जनसामान्यांमध्ये करणे आवश्यक असून आता यापुढे दुरुस्ती व पुनर्रचनेची कामे रखडली जाणार नाहीत असेही सर्वसामान्य नागरिकांना सांगणे आवश्यक आहे. मा. सभापती हयांनी तदनुषंगाने अशी विचारणा केली की, आजमितीस मंडळाकडे किती निधी उपलब्ध आहे.

मुख्य लेखाधिकारी हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, सन २००२-२००३ मध्ये उपकरापोटी रु. ८६.०५ कोटी प्राधिकरणास मिळाली आहे. यापैकी रु. ४६.०५ कोटी म.न.पा. ने परस्पर प्राधिकरणास दिले आहेत व उर्वरित रु. ४०.०० कोटी शासनामार्फत मंडळास मिळालेले आहेत. शासनाने हयावर्षी शासकीय अनुदानापोटी रु. ९१.८० कोटी व म्हाडाने रु. १०.०० कोटी अंशदान देऊ केले आहे. अशाप्रकारे मंडळाला हयावर्षी (२००२-२००३) रु. १८७.८५ कोटी निधी उपलब्ध झाला होता. उपकरापोटी अद्याप रु. ३५.२६ कोटी म.न.पा.कडून येणे बाकी आहे. तसेच रु. ५७.५७ कोटी अंशदान शासनाकडून येणे बाकी आहे. तसेच म.न.पा.कडून रु.२५ कोटी अंशदान येणे बाकी आहे. अशाप्रकारे एकूण ११७.८३ कोटी रुपये निधी शासनाकडून व म.न.पा.कडून येणे बाकी आहे.

सन २००२-२००३ मध्ये मंडळाने केलेला एकूण रु.१४७.७० कोटी पुनर्रचनेच्या कामासाठी रु.१८.१७ कोटी, संरचनात्मक दुरुस्तीसाठी रु.४२.९८ कोटी, संक्रमण शिबीरासाठी रु.१.३४ कोटी तसेच पुनर्रचित इमारतींच्या दुरुस्तीसाठी रु.३८.४६ कोटी खर्च केलेला आहे. अशाप्रकारे आतापर्यंत एकूण रु.१००.९५ कोटी खर्च करण्यात आला आहे.

सन २००३-२००४ मध्ये संरचनात्मक दुरुस्तीसाठी रु.४४.०० कोटीची तरतुद केली असून पुनर्रचनेच्या कामासाठी रु.३१.०० कोटीची तरतुद केलेली आहे. आतापर्यंत एकूण रु.११७.०० कोटी निधी येणे बाकी असून मंडळाकडे सद्यः रु.५०.०० कोटी शिल्लक आहेत. सन २००३-२००४ चे अंदाजपत्रक रु.१६६ कोटीचे आहे. मात्र मंडळाचे सध्याचे अंदाजपत्रक हे वरील रु. ११७.०० कोटी मंडळास उपलब्ध होतील असे गृहीत धरुन तयार केलेले आहे.

तदनंतर मा.सभापती हयांनी अशी विचारणा केली की, मध्यंतरीच्या काळात मंडळाने जे प्राधिकरणाडून पैसे घेतले होते ते परत केले आहेत का? तदनुसार मुख्य लेखाधिकारी हयांनी असे प्रतिपादनर केले की, मंडळाने

रु.१५.०० कोटी प्राधिकरणास वर्ग केले असून रु. ४३.०० कोटी अद्याप परत करावयाचे आहेत. रु.११७.०० कोटी रुपये मिळविण्यासाठी शासनाकडे पाठपुरावा चालू आहे.

----------------oo-------------

तदनंतर मा.सभापती हयांनी अशी विचारणा केली की, मंडळाच्या मागील बैठकीत पुनर्रचित इमारतींच्या बांधकामात सुधारणा करण्याबाबत चर्चा करण्यात आली होती. त्याबाबत काय कार्यवाही करण्यात येत आहे?

उपमुख्य अभियंता (पुनर्र) हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादनर केले की, मंडळातर्फे सद्यः पुनर्रचित केल्या जाणा-या इमारतींमध्ये लोखंडी खिडक्या बसवल्या जातात. त्यांची साईज ३ फूट x ४फूट असते. हया खिडक्या कालांतराने गंजून खराब होत असल्याने यापुढे ॲल्युमिनियम स्लाईडिंग विंडो बसविण्याचे प्रस्तावित आहे. ॲल्युमिनियम स्लाईडिंग विंडो बसविण्याचे ठरल्यास खिडकीची सद्यःची जी साईज आहे त्यामध्ये वाढ करावी लागणार आहे. तसेच हया खिडक्यांना बाहेरुन लोखंडी जाळी बसवावी लागेल. तसेच सद्यः आपण सिमेंट टाईल्स बसवितो त्या योग्य रितीने स्वच्छ करता येत नसल्याने सिरॅमिक टाईल्स बसविण्याचे प्रस्तावित आहे. आपण सद्यः इमारतींना बाहेरुन जो रंग देतो तो वॉटरप्रूफ सिमेंट पेंट देतो. हा रंग कालांतराने खराब होतो. त्यामुळे सॅटेक्स पें बाहेरुन की दर्शनी भागापुरता देण्यो प्रस्तावित आहे. सध्या आपण ब्लॅक कडाप्पा किचन प्लॅटफॉर्म करण्याचे प्रस्तावित आहे. अशाप्रकारच्या सुधारणा करण्याचे प्रस्तावित आहे. अशाप्रकारच्या सुधारणा करण्याचे प्रस्तावित असून त्याबाबत मुख्य अभियंता-२/प्राधिकरण हयांच्याशी सल्लामसलत सुरु आहे. हा प्रस्ताव अंतिम झाल्यानंतर त्याबाबत मंडळाच्या पुढील बैठकीत सविस्तर प्रस्ताव सादर केला जाईल.

-------------------oo-------------

मा. सदस्य श्री.रमेश परब हयांनी तदनंतर असा मुद्दा उपस्थित केला की, सेनापती बापट मार्गावरील तपोवन हया पुनर्रचित इमारतीतील अरुण क्रिडी मंडळ येथे बालवाडी, अभ्यासिका व व्यायाम शाळा बांधण्यासाठी ना.ह.प्र.पत्र सदर क्रिडा मंडळाने मागितलेलेआहे. मात्र आपल्या मंडळाच्या अधिका-यांनी त्यांना वास्तुशास्त्रज्ञाकडून बांधकामाचा नकाशा वगैरे सादर करण्यास सांगितले आहे. मंडळाने ना.ह.प्र.पत्र दिल्याशिवाय महापालिका नकाशांना मंजूरी देत नाही. मंडळाच्या मागील बैठकीत हयाबाबत विस्तृत चर्चा करण्यात आली होती व ना.ह.प्र.पत्र देण्याचे ठरले होते. त्यामुळे हया अरुण क्रिडा मंडळास लवकरात लवकर ना.ह.प्र.पत्र देण्याची कार्यवाही व्हावी.

उपमुख्य अभियंता (पुनर्र) हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, ना.ह.प्र.पत्र देण्याच्या सूचना संबंधित कार्यकारी अभियंत्यांना दिलेल्या आहेत.

मा. सभापती हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, मंडळाने त्यांना अद्याप ना.ह.प्र.पत्र दिलेले नसून सदर क्रिडा मंडळास असे सांगितले आहे की, त्यांनी त्यांचा वास्तुशास्त्रज्ञ नेमून परस्पर म.न.पा.कडून नकाशांना मंजूरी घ्यावी व तदनंतर मंडळ ना.ह.प्र.पत्र देईल. मात्र जोपर्यंत मंडळ ना.ह.प्र.पत्र देत नाही तोपर्यंत म.न.पा. नकाशांना मंजूरी देत नाही मंडळाच्या मागील बैठकीत वास्तविक असे ठरले होते की, सदर क्रिडा मंडळास

अटी व शर्तीच्या आधीन राहून ना.ह.प्र.पत्र देण्यात यावे असे ठरल्यानंतरही आपण ५ ते ६ महिन्यांपासून ना.ह.प्र.पत्र न देणे ही बाब योग्य नाही.

मा. सदस्य श्री.विश्वास मोकाशी व मा. सदस्य श्री. बाप्पा सावंत हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, श्री. पालीवाल, का.अ./पु.वि.३ हयांना मंडळाच्या मागील बेठकीत स्पष्ट सूचना देण्यात आल्या होत्या की, हया प्रकरणी ना.ह.प्र.पत्र देण्यात यावे. हयाचा अर्थ असा होतो की, मंडळाने जरी ना.ह.प्र.पत्र देण्यास मंजूरी दिली असली तरी ते का.अ./पु.वि.३ हयांना द्यावयाचे नाही. ना.ह.प्र.पत्र कसे द्यावे हयाबाबतही का.अ./पु.वि.३ हयांना सांगण्यात आले होते. असे असताना एकच मुद्दा मंडळाच्या बैठकीत वारंवार उपस्थित करणे चुकीचे आहे.

उपमुख्य अभियंता (पुनर्र) हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, ना.ह.प्र.पत्र देण्याबाबतच्या सूचना का.अ./पु.वि.३ हयांना देण्यात आल्या असून त्याबाबत चौकशी करुन कार्यवाही केली जाईल.

-----------------oo--------------

तदनंतर मा. सदस्य श्री.रमेश परब हयांनी असा मुद्दा उपस्थित केला की, मंडळाच्या मागील बैठकीत ठरल्यानुसार आपण २७४ घुसखोरांना नियमित करणार होतो. सहा महिन्यांपूर्वी त्याबाबत मंडळाच्या बैठकीत निर्णय होऊन नंतर प्राधिकरणानेही त्यास मंजूरी दिलेली आहे. परंतु तदनंतर त्याबाबत काहीच कार्यवाही झालेली नाही. त्यामुळे हयाबाबतची नेमकी वस्तुस्थिती काय आहे अशी विचारणा मा. सदस्य श्री. रमेश परब व श्री. रघुनाथ थवई यांनी केली.

तदनुषंगाने सहमुख्य अधिकारी यांनी असे प्रतिपादन केले की, २७४ घुसखोरांना नियमित करण्याचा निर्णय घेतल्यानंतर त्यानुसार कार्यवाही सुरु करण्यात आली होती. दोन प्रकरणांमध्ये देकार पत्र दिल्यानंतर पैसेही भरुन घेण्यात आले होते. हयाच कालावधीत लेखा विभागाकडून छाननी चालू असताना त्याबाबत लेखा शाखेने असे आक्षेप घेतले आहेत की, मंडळ हे गाळे ३० टक्के कामे किंमतीत विकत असल्याने त्याबाबत खुलासा करावा. त्या अनुषंगाने प्राधिकरणाकडे ठरावात सुधारणा करण्यासाठी प्रस्ताव सादर केलेला आहे. सदर प्रकरणी प्राधिकरणाकडून ठरावात सुधारणा केल्यानंतर त्याबाबत लेखा शाखेला कळवून पुढील कार्यवाही केली जाईल.

मा. सदस्य श्री. बाप्पा सावंत हयांनी तदनंतर अशी विचारणा केली की, जे रहिवाशी फसवणुकीने सध्या संक्रमण शिबीरात घुसखोर म्हणून रहात आहेत त्यांनाही आपण नियमित करणार आहोत का?

मा. सदस्य श्री. सचिन सावंत हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, ८-१० महिन्यांपूर्वी दहिसर संक्रमण शिबीरातील घुसखोरांच्या नियमितीकरणाचा मुद्दा उपस्थित करण्यात आला होता. हया संक्रमण शिबीरात जवळ जवळ ८७ टक्के घुसखोर आहेत. त्यामुळे हया ठिकाणी पुनर्विकासाची योजना राबवावी किंवा कसे हयाबाबत चर्चा करण्यात आली होती. त्याबाबतही विचार होणे आवश्यक आहे.

मा. सभापती हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की,वास्तविक घुसखोर व्यक्तींना आपण गाळयांतून बाहेर काढणे आवश्यक आहे. मागे आपण २००० ते ३००० घुसखोरांना गाळयांतून बाहेर काढले आहे. आपल्या सन्मा. सदस्यांच्या मदतीने वा गरज पडल्यास पोलीस मदत घेऊन घुसखोर व्यक्तींना बाहेर काढणे आवश्यक आहे. त्यामुळे दहिसर संक्रमण शिबीरातीलही घुसखोरांना गाळयांतून बाहेर काढण्याची कार्यवाही सुरु करावी असे आदेश मा. सभापती हयांनी दिले. जेणेकरुन त्याठिकाणी चांगली पुनर्विकास योजना राबविणे शक्य होईल.

मा. सदस्य श्री. रघुनाथ थवई हयांनी तदनंतर असे प्रतिपादन केले की, सर्वात मोठे संक्रमण शिबीर हे सायन येथे आहे. हया ठिकाणी काही संक्रमण शिबीरे पाडून त्या ठिकाणी सात मजल्याच्या इमारती शिर्के

कन्स्ट्रक्शन कं. मार्फत बांधल्या आहेत. सध्या कॅंप नं.१ व २ मधील रहिवाशांना जागा खाली करण्याच्या सूचना देऊन आपण नवीन ७ मजल्यांच्या इमारतींमध्ये जागा देत आहोत. हयामध्ये आपण घुसखोरांनासुध्दा जागा खाली करण्याच्या सूचना देऊन नवीन इमारतीत जागा देत आहोत.

मा. सभापती हयांनी तदनुषंगाने मुख्य अधिकारी हयांना अशी विनंती केली की, त्यांनी हयाप्रकरणी लक्ष घालून घुसखोरांना गाळयांतून बाहेर काढण्याची कार्यवाही सुरु करावी. हे करीत असताना अधिकारी/कर्मचारी वर्गाकडून कुचराई होत असेल तर त्यांच्यावरही कार्यवाही करावी. तदनुषंगाने एक परिपत्रक काढून त्याची कल्पना सर्व संबंधित अधिकारी/कर्मचारी वर्गास द्यावी. शासनानेही हया प्रकरणी लक्ष घालावे.

उप सचिव, महाराष्ट्र शासन, गृहनिर्माण विभाग यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, घुसखोरांना गाळयातून बाहेर काढण्याची मोहीम हाती घेण्याबाबत मा. प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, गहनिर्माण विभाग हयांनी मुख्य अधिकारी हयांना १५ दिवसांपूर्वी आदेश दिलेले आहेत.

मा. सदस्य, श्री. विश्वास मोकाशी हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, हया घुसखोरांना संक्रमण शिबीरातील गाळयांतून बाहेर काढण्याची मोहीम त्वरित हाती घेऊन कार्यवाही करणे आवश्यक आहे.

मुख्य अधिकारी हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, हयाबाबत लवकरच कार्यवाही सुरु केली जाईल.

--------------oo---------------

मा. सदस्य श्री.रमेश परब हयांनी तदनंतर असे प्रतिपादन केले की, प्रभादेवी येथील मानाजी राजूजी चाळ क्र.४ ते ६ हया इमारतींची पुनर्रचना करण्यात आली असून गाळे वाटपाची सोडतही काढण्यात आली आहे. मात्र रहिवाशांना अद्याप गाळयांचा ताबा दिला न सून इमारतीचे नामकरणही केलेले नाही. हयाबाबत त्वरित कार्यवाही होणे आवश्यक आहे.

मा. सभापती हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, रहिवाशांनी जर नामकरणासाठी कार्यालयास पत्र दिले असेल तर त्यास मंडळ नेहमीच मान्यता देत असते. त्यामुळे रहिवाशांनी सुचविलेल्या नावास मंडळाची मंजूरी गृहीत धरुन पुढील कार्यवाही करावी.

----------------oo---------------

बैठकीच्या अखेरीस मा. सभापती हयांनी उपस्थित सन्मा सदस्य, सर्व अधिकारी व कर्मचारीवर्गाचे आभार मानून आजची बैठक संपल्याचे जाहीर केले तसेच मंडळाची पुढील बैठक सोमवार दि. २ जून २००३ रोजी दुपारी ४.०० वाजता घेण्यात येईल असे जाहीर केले.

सचिव/मुं.इ.दु.वपु.मंडळ

मुख्य अधिकारी/मुं.इ.दु. व पु.मंडळ

मा. सभापती/ मुं.इ.दु. व पु.मंडळ

## परिशिष्ट "अ"

### मंडळाच्या दि.२/५/२००३ रोजी झालेल्या बैठकीत प्रशासकिय मंजुरी देण्यांत आलेल्या अंदाजपत्रकांची यादी

| अ.क्र | विभाग | वर्गवारी | इमारतीचे नांव | दुरुस्ती टप्पा<br>---------------<br>मंडळ/<br>ना.ह.प्र. | मजले<br>-----------<br>भाडेकरु<br>नि+अनि=एकूण | क्षेत्रफळ<br>चौ.मी.<br>---------------<br>दर चौ.मी.चा<br>खर्च | अंदाजपत्रकाची<br>एकूण रक्कम<br>----------------<br>निव्वळ टप्प्याची<br>रक्कम | रु.१०००/-प्रति<br>चौ.मी.मंजुरी<br>करीता प्रस्तावित<br>रक्कम | रु.१०००/-<br>प्रति<br>चौ.मी.जास्त<br>असलेली<br>रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. | ८. | ९. | १०. | ११. |
| १. | ई | क | १६६-१७०, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मार्ग, भीमा भवन, मुंबई | पहिला टप्पा<br>मंडळ | तळ+ २<br>२ + ४ = ६ | २५२.७४<br>२१२.८६ | ५३,९७८/-<br>५३९७८/- | ५३९७८/- | -- | मंजूर |
| २. | -"- | अ | २१, अल्बर्ट रोड, मुंबई | तिसरा टप्पा<br>मंडळ | तळ+ २<br>२४ + ९ = ३३ | १३१२.००<br>९१६.६६ | १२०२६५३/-<br>६६०९१२/- | ६६०९१२/- | -- | -"- |
| ३. | -"- | -"- | १६५-१३९अे, १३९ बी, सेठ मोतीशा लेन, मुंबई | प.टप्पा सुधा<br>मंडळ | तळ + १<br>१० + १= ११ | ६३५.७३<br>९५३.३५ | ६०६०७६/-<br>६०६०७६/- | ६०६०७६/- | -- | -"- |
| ४. | -"- | -"- | २००-डी, डॉ.मस्करेन्हास मार्ग (पदमशी वाडी), मुंबई | दु.टप्पा सुधा<br>मंडळ | तळ + ३<br>३४ + ०= ३४ | १००७.००<br>९६७.५२ | ९४७२९७/-<br>७६६४८०/- | ७६६४८०/- | -- | -"- |
| ५. | फ.ग/द | अ | १८, छेडड़ा निवास, करी रोड, मुंबई | चौथा टप्पा<br>मंडळ | तळ+ १<br>३६ + ३ = ३९ | ५७५.१२<br>९८१.३४ | ५६४३८९/-<br>१३९३३०/- | १३९३३०/- | -- | -"- |
| ६. | -"- | अ | ४६६-अे, लालजी आनंदजी चाळ, डॉ.बी.ए.रोड, लालबाग, मुंबई | ति.टप्पा सुधा<br>मंडळ | तळ+ ३<br>५२ + ०= ५२ | १३५७.६८<br>९९४.७० | १३५०४८६/-<br>६८९२८६/- | ६८९२८६/- | -- | -"- |
| ७. | फ.ग/उ | अ व ब | ३६-बी, कुबल निवास, गोखले रोड, दादर, मुंबई | प.टप्पा सुधा<br>मंडळ | तळ+ ५<br>१० + २ = १२ | ७६५.७१<br>९६२.३९ | ७३६९१२/-<br>७३६९१२/- | ७३६९१२/- | -- | -"- |
| ८. | -"- | अ व क | १६९, गोदावरी कृपा, शिवाजी पार्क, दादर, मुंबई | दु.टप्पा सुधा<br>मंडळ | तळ+ ३<br>६+ १ = ७ | ८१६.३९<br>९७५.७१ | ७९६५५८/-<br>६८७५५८/- | ६८७५५८/- | -- | -"- |

## परिशिष्ट "ब"

**मंडळाच्या दिनांक २/५/२००३ रोजी बैठकीत प्रशासकिय मंजूरी देण्यांत आलेल्या दक्षिण परिमंडळातील अंदाजपत्रकांची यादी.**

| अ.क्र. | इमारतीचा तपशिल | दुरुस्तीचा टप्पा मंडळ/नाहप्र | मजल्यांची संख्या | इमारतीचे बांधकाम क्षेत्रफळ / दुरुस्तीचा दर | अंदाजपत्रकाची एकूण रक्कम | निव्वळ टप्प्याची रक्कम | रू.१०००/- प्रती चौ.मी. मर्यादेतील | रू.१०००/- प्रती चौ.मी. मर्यादेपेक्षा अधिक असलेली रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | **अ विभाग** | | | | | | | | |
| १ | १३२ महर्षी कर्वे रोड, स्वस्तिक कोर्ट | दुसरा / मंडळ | तळ + ५ / १२ + ० = १२ | २६४५.२४ / ५२१.६७ | १३७९९४५.०० | १०८९९४५.०० | १०८९९४५.०० | ० | मंजूर |
| २ | ११०-११२ पेरिन नरिमन स्ट्रीट | दुसरा / मंडळ | तळ + ५ / ६ +० १ = ०७ | ३०३.०३ / १०८७.७५ | ३२९६३९.०० | १७८१२४.०० | १५१५३०.०० | २६५९१.०० | मंजूर |
| ३ | ३०३, शहित भगतसिंग रोड | तिसरा / मंडळ | तळ + ४+ ५ पार्ट / १ + १२ = १३ | ११३६.९४ / ९९८.७५ | ११३५५५१.०० | ३०५८९१.०० | ३०५८९१.०० | ० | मंजूर |
| | **ब विभाग** | | | | | | | | |
| ४ | १०६ नवरोजी हिल रोड नं.२/ ३ नवरोजी हिल रोड नं.४, शांती बिल्डिंग | पहिला / नाहप्र | तळ + ५ / १८ +०४ = २२ | १४९१.०२ / ६०३.६२ | ९०००१२.०० | ९०००१२.०० | ९०००१२.०० | ० | मंजूर |
| ५ | ३९ इब्राहिम मोहम्मद मर्चंट रोड | चौथा / मंडळ | तळ + ४ / १४ + ६ = २० | १२४६.६९ / ९९९.२३ | १२४५७३७.०० | २८९८०९.०० | २८९८०९.०० | ० | मंजूर |
| ६ | ३ नवरोजी हिल रोड नं.२१ | दुसरा / मंडळ | तळ + ४ / ५० + १५ = ७२ | २०१७.४८ / ६७९.५२ | १३७०९२१.०० | ५२७१७९.०० | ५२७१७९.०० | ० | मंजूर |
| ७ | २-२ दोन्ताड स्ट्रीट | दुसरा (सु.) / मंडळ | तळ + १ / ८ + १० = १८ | ५००.०० / १००७.२२ | ५०३६१०.०० | ४४२२३०.०० | ४३८६२०.०० | ३६१०.०० | मंजूर |
| ८ | १२ नवरोजी हिल रोड नं.५ | तिसरा / मंडळ | तळ + ३ / ३९ + १२ = ५१ | २०४६.६२ / ७४७.२८ | १५२९४०९.०० | ६७४२५९.०० | ६७४२५९.०० | ० | मंजूर |

### सी १-२ विभाग

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ९ | १०८-११८ एस. व्ही. पी. रोड (१८८ चिमणा बुच्चर स्ट्रीट) | तिसरा/सु मंडळ | तळ + ३<br>४६ + ११ = ५७ | १४६०.७१<br>१०१०.८२ | १४७६५१०.०० | १०५१५६८.०० | १०३५७६८.०० | १५८००.०० | मंजूर |
| १० | ४७-४९ सैफि ज्युबिली स्ट्रीट | दुसरा मंडळ | तळ + ३ + ४ भाग<br>२० + ०६ = २६ | ९९६.०६<br>९३२.२९ | ६४८९३०.०० | ३९९७२३.०० | ३९९७२३.०० | ० | मंजूर |
| ११ | ७९-८३, सुतार चाळ | पहिला मंडळ | तळ + ३ + ४ भाग<br>६ + १२ = १८ | ७४०.५२<br>९३०.७५ | ६८९२४१.०० | ६८९२४१.०० | ६८९२४१.०० | ० | मंजूर |
| १२ | ९१-९३-९५ सैफि ज्युबिली स्ट्रीट | तिसरा/सु मंडळ | तळ + ३ + ४ भाग<br>२३ + ०७ = ३० | ७२४.५६<br>१००५.१८ | ७२८३१०.०० | ३८४०४०.०० | ३८०२९०.०० | ३७५०.०० | मंजूर |

### सी ३-४ विभाग

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १३ | ३९९ बी काळबादेवी रोड | तिसरा/सु. मंडळ | तळ + १<br>३ + ०६ = ०९ | ३५३.६४<br>१८०३.०७ | ६३७६३९.०० | ५७५६५९.०० | २९१६०७.०० | २८३९९९.०० | मंजूर |
| १४ | २८० एल. टी. मार्ग | पांचवा नाहप्र | तळ + ५<br>३४ + ७८ = ११२ | ३७४५.१३<br>१२३७.७७ | ४६३५६३८.०० | १६७९४१४ | ७८८९०६.०० | ८९०५०८.०० | मंजूर |
| १५ | ४ अे, रोपा लेन | दुसरा मंडळ | तळ + १<br>१ + १ = २ | २२२.४८<br>९८३.१० | २१८७२२.०० | १६६६२७.०० | १६६६२७.०० | ० | मंजूर |

### डी-१ विभाग

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १६ | २० खोताची वाडी | पहिला मंडळ | तळ + २<br>६ + ० = ०६ | ४४५.६३<br>६३६.८५ | २८३८००.०० | २८३८००.०० | २८३८००.०० | ० | मंजूर |
| १७ | ७७-७९ राजाराम मोहन रॉय रोड | दुसरा मंडळ | तळ + ३<br>३० + १२ = ४२ | १५४०.७८<br>५१३.२३ | ७९०७८०.०० | ३०८५०७.०० | ३०८५०७.०० | ० | मंजूर |
| १८ | ४ भेंडी गल्ली | दुसरा मंडळ | तळ + १ व ॲटीक<br>१० + ० = १० | २४५.२५<br>११७४.५८ | २८८०६८.०० | १६५४४२.०० | १२२६२५.०० | ४२८१७.०० | मंजूर |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १९ | १४६-१४८ विठ्ठलभाई पटेल मार्ग, प्रभू निवास | दुसरा/सु मंडळ | तळ + ५ / १७ + ४ = २१ | २८७५.६९ / ८०३.२३ | २३०९८६६.०० | १६३७०६४.०० | १६३७०६४.०० | ० | मंजूर |
| २० | ६१ एच खाडिलकर मार्ग | तिसरा नाहप्र | तळ + १ / २०+ ०१ = २१ | ८८१.९७ / ९५२.६६ | ८४०२२१.०० | ४०५८४५.०० | ४०५८४५.०० | ० | मंजूर |
| २१ | ५५ जे. एस. एस. रोड | तिसरा मंडळ | तळ + ०४ / ४+ ३६ = ४० | १८६९.३३ / ८५२.३३ | १५९३२५१.०० | ७७८५७३.०० | ७७८५७३.०० | ० | मंजूर |
| २२ | २४७ बी, व्ही. पी. रोड | पहिला मंडळ | तळ + ०१ + भाग२ / १+ ० = ०१ | १९०.३४ / १३३५.९० | २५४२८२.०० | २५४२८२.०० | १९०३४०.०० | ६३९४२.०० | मंजूर |
| २३ | १६-१८ भटवाडी दुसरी लेन | दुसरा मंडळ | तळ + ०२ / ६+ ० = ०६ | ४९३.४८ / ९३७.४० | ४६२५८७.०० | ४२३४९३.०० | ४२३४९३.०० | ० | मंजूर |
| | **डी-२ विभाग** | | | | | | | | |
| २४ | १८५ डॉ. डी. बी. मार्ग, लॅमिंग्टन रोड | चौथा मंडळ | तळ + ४ / ०८ + ०२ = १० | १३०३.०० / १०३४.०३ | १३४७३४३.०० | १००४६२९.०० | ९६०२८६.०० | ४४३४३.०० | मंजूर |
| २५ | ५४ इ खुरशेटजी राणा स्ट्रीट | चौथा मंडळ | तळ + २ / १५ + ० = १५ | ६५५.३८ / १८५५.४८ | १२१६०४८.०० | ६७६६०५.०० | ११४९५७.०० | ५६१६४८.०० | मंजूर |
| २६ | २९२ जावजी दादाजी मार्ग, कृष्णा बिल्डिंग | पहिला मंडळ | तळ + ४ / ३७+ १ = ३८ | १४७५.७० / २९८.१९ | ४४००४९.०० | ४४००४९.०० | ४४००४९.०० | ० | मंजूर |
| २७ | २७५ जावजी दादाजी मार्ग, | पहिला मंडळ | तळ + ३ / १२+ ० = १२ | ७६९.६६ / ६५६.२८ | ५०५११३.०० | ५०५११३.०० | ५०५११३.०० | ० | मंजूर |